। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ११८ वा । बुधवार दिनांक १५ जुलै २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## आठवडाभरात पिकविम्याची ३३७ रक्कम जमा करा,केंद्रीय समितीचे विमा कंपनीला आदेश;
## धाराशिवच्या बळीराजाने जिंकली कायदेशीर लढाई! आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी बांधवांसाठी एक अत्यंत दिलासादायक आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. खरीप २०२५ च्या पिकविमा संदर्भात राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयाला केंद्रीय समितीने कायम ठेवले आहे. पिकविमा कंपनीने दाखल केलेले अपील फेटाळून लावत पुढील सात दिवसात पात्र शेतकरी बांधवांच्या खात्यात ३३७ कोटी

विमा रक्कम वितरित करण्याचे आदेशही केंद्रातील टीएसी (ढ-उ) समितीने दिले आहेत. जिल्ह्यातील बळीराजाने कायदेशीर लढाई जिंकली आहे. या निर्णयानुसार पुढील सात दिवसांच्या आत विमा कंपनीने ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करणे बंधनकारक असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

केंद्र सरकारच्या तांत्रिक सल्लागार समितीने राज्य सरकारने शेतकरी बांधवांच्या बाजूने घेतलेल्या भूमिकेवर आणि निर्णयावर ठाम राहत शेतकरी बांधवांच्या बाजूने निकाल कायम ठेवला आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे धाराशिव जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना साधारणपणे ३३७ कोटी रुपयांची विमा रक्कम आता लवकरच उपलब्ध होणार आहे. मागील अनेक दिवसांपासून शेतकरी नेते, विविध शेतकरी संघटना, स्थानिक प्रतिनिधी आणि कृषी विभागाच्या वतीने सातत्याने त्यासाठी आपला पाठपुरावा सुरू होता. अखेर शेतकरी बांधवांना त्यांच्या कष्टाचे आणि केलेल्या संघर्षाचे फळ मिळाले आहे. या लढ्यात सहकार्य केलेल्या सर्व घटकांचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी मनापासून आभारही मानले आहेत.

खरीप २०२५ मध्ये धाराशिव जिल्ह्यात सोयाबीन पिकासाठी एकूण ५०४ पीक कापणी प्रयोग (उीॅींळपस एुशीळाशपीी - उउए) घेण्यात आले होते. त्यापैकी ५६ महसूल मंडळांतील तब्बल ३६८ प्रयोगांवर विमा कंपनीने आक्षेप घेत राज्य तांत्रिक सल्लागार समितीकडे दाद मागितली होती. राज्यस्तरीय तपासणीनंतर डढ-उ ने विमा कंपनीचे आक्षेप फेटाळून लावले होते. त्यानंतर कंपनीने केंद्रीय ढ-उ कडे अपील दाखल केले. सुनावणीदरम्यान केंद्रीय ढ-उ ने नमूद केले की, विमा कंपनीने केलेल्या अनेक आरोपांना कोणतेही ठोस दस्तऐवजी पुरावे सादर करण्यात आले नाहीत. पीक कापणी प्रयोगांमध्ये फेरफार, नियमभंग किंवा प्रक्रियेत गंभीर त्रुटी झाल्याचे सिद्ध करण्यात कंपनीला अपयश आले. त्यामुळे अपील ग्राह्य धरता येत नसल्याचे समितीने स्पष्ट केले.त्यामुळे आता शेतकरी बांधवांना त्यांच्या हक्काची विम्याची रक्कम मिळण्यास लवकरच सुरुवात होईल, असा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला जात आहे.

**तांत्रिक उत्पादन पद्धतीचे दोष पाहता पीक विमा धोरणात बदलासाठी राज्य शासन केंद्राकडे आग्रही भूमिका घेणार.**

जिल्ह्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या २०२५-२६ हंगामात तांत्रिक उत्पादन निश्चितीबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्याने आपण परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या तज्ज्ञांकडून याबाबत स्वतंत्र वैज्ञानिक अभ्यास करून अहवाल घेतला होता. या अभ्यासामध्ये उ्छड-ढ मॉडेलद्वारे तांत्रिक उत्पादन निश्चिती, प्रत्यक्ष पीक कापणी प्रयोग, हवामानातील बदल, अतिवृष्टी, पाणी साचणे, रोग-किडींचा प्रादुर्भाव तसेच स्थानिक कृषी परिस्थिती यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला. या अभ्यासातून विद्यमान तांत्रिक उत्पादन निश्चिती पद्धतीत गंभीर त्रुटी असल्याचेही स्पष्ट झाले होते. याअनुषंगाने आपण राज्याचे कृषीमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्याकडे बैठक घेण्याची मागणी केली होती त्याला अनुरून आज त्यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत राज्य सरकारच्या माध्यमातून तांत्रिक उत्पादन पद्धत सदोष असल्याने शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवत याबाबत धोरणात्मक बदल करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याचा निर्णय झाला असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

## क्राईम न्युज

### चार लाख चाळीस हजारची केली चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अक्षय सुरेश राक्षे, वय ३० वर्षे, रा. पांडुरंग नगर तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे राहते घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.१२.०७.२०२६ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील रोख रक्कम २,००,००० व ५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा एकुण ४,४०,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अक्षय राक्षे यांनी दि.१३.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१(४), ३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### घरात प्रवेश करुन सोन्याचे दागिने व मोबाईलची चोरी

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अनिल गोरख ढगे, वय ४२ वर्षे, रा. काटी ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे राहते घराचा कडी कोंडा अज्ञात दोन व्यक्तीने दि. १२.०७.२०२६ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील १९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व मोबाईल फोन असा एकुण ६०,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अनिल ढगे यांनी दि.१३.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तामलवाडी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१(४), ३०५, ३(५)अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोठे १८ बोकड व २ शेळ्याची चोरी

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-काका बन्सी फाळके, वय ४५ वर्षे, रा. नान्नजवाडी ता. भुम जि. धाराशिव यांचे नान्नजवाडी शिवारातील शेतातील शेडची जाळी अज्ञात व्यक्तीने दि. १२.०७.२०२६ रोजी २२.०० ते दि. १३.०७.२०२६ रोजी कापुन शेडमधील लहान मोठे १८ बोकड व २ शेळ्या असा एकुण ९२,००० किंमतीचे बोकडे व शेळ्या चोरुन नेल्या.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-काका फाळके यांनी दि.१३.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद.

परंडा(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत अशोक लिलॅण्ड कंपनीचा टिपर क्र एमएच १८ बीझेड १५९४, अशोक लिलॅण्ड कंपनीचा टिपर क्र एमएच १८ बीझेड १५९१ चे चालकांनी दि.१३.०७.२०२६ रोज आपआपल्या ताब्यातील वाहने ही बार्शी परंडा रोडवर जनाई पार्क व यश फर्निचर मॉल चे समोर परंडा येथे सार्वजनिक रोडवर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना परंडा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द परंडा पो.ठा. येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

## विघटनाच्या प्रस्तावाला तांत्रिक मान्यता मिळेना, डेपोवरील कचऱ्याचा डोंगर हटेना



धाराशिव (प्रतिनिधी)-गेल्या १६ वर्षांपासून शहरातील कचरा डेपोवर साचलेला कचरा नष्ट करण्यासाठी तब्बल १० कोटी ८० लाख रुपये खर्च येणार आहे. यासाठी नगरपालिकेने तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठवून चार महिने होत आले तरी त्याला मान्यता मिळालेली नाही. यामुळे कचरा डेपो अन्य ठिकाणी हलवण्याच्या प्रयत्नांनाही खो बसला आहे.

शहरातील कचरा डेपो जवळपास अर्ध्या शहरासाठी मोठी डोकेदुखी बनला आहे. वरचेवर कचऱ्याचे विघटन करून तो नष्ट करण्यात आला नसल्यामुळे येथे कचऱ्याचे मोठे डोंगर तयार झाले आहेत. गेल्या १५ वर्षांपासून कचरा नष्ट करण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. यामुळे येथील कचरा डेपो नागरिकांसाठी मोठी समस्या बनला आहे. सातत्याने कचरा डेपो हलवण्याची मागणी करण्यात येत आहे. यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी निवडणुकीत कचरा डेपो हलवण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार, आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनीही कचरा डेपो हलवण्याचे निर्देश नगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांना दिले होते; त्यानुसार प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. त्या अनुषंगाने, येथील कचरा नष्ट करण्यासाठी १० कोटी ८० लाख रुपये आवश्यक आहेत. या संदर्भातील प्रस्ताव तयार करून नगरपालिकेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे मंजुरीसाठी पाठवला. मात्र, प्रस्ताव पाठवून आता चार महिने होत आहेत. परंतु, अद्यापही याला तांत्रिक मान्यताच मिळालेली नाही.

## अनैतिक देह व्यापार करणाऱ्या लॉजवर छापा दोन महिलांची सुटका आरोपी विरुध्द गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- कळंब पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून मिळालेली माहिती अशी की, पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक ी. सचिन पांडकर व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कळंब पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक शेख यांच्या पथकाने कळंब पोलीस ठाणे हद्दीतील अवैध धंद्यांविषयी माहिती काढुन कायदेशीर कारवाई करण्यासाठी दि. १३.०७.२०२६ रोजी गस्तीस होते. गस्ती दरम्यान पोलीस निरीक्षक शेख यांना माहिती मिळाली कि, कळंब येथील एका लॉज मध्ये काही महिलांद्वारे वेश्या व्यवसाय करवुन घेत आहेत. यावर पथकाने एका बनावट ग्राहकास तेथे पाठवून बातमीची खात्री करुन नमूद लॉजवर १ छापा टाकला असता लॉज मध्ये दोन महिला आढळुन आल्याने महिला पोलीसांमार्फत त्यांची विचारपुस केली असता समाधान रा. इंदीरानगर कळंब, अमोल वय ३६ वर्षे, रा. हासेगाव ता. कळंब, नरेश रा बसस्थानक समोर कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांचे सांगण्यावरुन त्या महिलांना वाणिज्यिक प्रयोजनाकरीता आश्रय देउन त्यांना लैंगीक स्वैराचाराकरीता परावृत्त करत होते व नमुद दोघेजण त्यावर स्वत:ची उपजिवीका करत आहेत असे समजले. यावरुन पथकाने नमुद व्यक्तींना ताब्यात घेउन त्यांच्या ताब्यातील मोबाईल फोन, नोंदीचे रजिस्टर, रोख रक्कम ६,२०० व निरोधची पाकीट असा एकुण १६,२०० माल हस्तगत केला. पोलीसांनी संबंधीत वेश्या व्यवसाय करणाऱ्या लॉजवरील त्या महिलांची सुटका करुन समाधान रा. इंदीरानगर कळंब, अमोल वय ३६ वर्षे, रा. हासेगाव ता. कळंब, नरेश रा बसस्थानक समोर कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांचेविरुध्द गुरनं २९८/२०२६ बी.एन.एस सह १४३(३), १४४(२), सह कलम ३, ४, ५, ६ मानवी अनैतिक व्यवसाय प्रतिबंधक अधिनियम अन्वये तामलवाडी पोलीस ठाण्यात दि. १३.०७.२०२६ रोजी गुन्हा नोंदवला आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कळंब पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री शेख पोलीस ठाणे कळंबचे पोलीस पथकाने केली.

## संत गजानन महाराजांच्या पालखींचे गोविंदपूरमध्ये विसावा,वारकऱ्यांनी घेतला पिठलं-भाकरीचा आस्वाद



कळंब (शीला उंबरे-पेंढरकर)-'सेवा हीच भक्ती आणि अन्नदान हाच महायज्ञ' या भावनेने ओतप्रोत भरलेल्या गोविंदपूर ग्रामस्थांनी यंदाही संत श्री गजानन महाराजांच्या पालखीचे भक्तिभावाने आणि उत्स्फूर्तपणे स्वागत केले. गेल्या अनेक दशकांपासून सुरू असलेल्या पिठलं-भाकरी अन्नदानाच्या परंपरेतून ग्रामस्थांनी संतसेवेचा वारसा जपला आहे. दरवर्षी सुमारे ५० हजार भाकऱ्या तयार करून पालखीतील हजारो वारकरी तसेच परिसरातील भाविकांना प्रेमाने महाप्रसादाचे अन्नदान केले जाते. सेवा, समर्पण आणि ग्रामएकतेचा हा अनोखा सोहळा गोविंदपूरच्या भक्तीपरंपरेचे जिवंत प्रतीक ठरला आहे.

गजानन महाराजांची पालखी कळंब शहरातून पुढे गोविंदपूर येथे पोहोचताच भक्ती, सेवा आणि समर्पणाचा अनोखा संगम अनुभवायला मिळतो. गेल्या पन्नासहून अधिक वर्षांपासून गोविंदपूरमध्ये पालखीसोबत चालणाऱ्या वारकऱ्यांसाठी पिठलं-भाकरीच्या अन्नदानाची अखंड परंपरा सुरू आहे. कै. पंढरीनाथ पाटील यांच्या प्रेरणेतून सुरू झालेला हा उपक्रम आज संपूर्ण गावाला सेवाभावाच्या एका पवित्र धाग्यात बांधून ठेवणारा ठरला आहे.

या दिवशी संपूर्ण गावातील चुली वारकऱ्यांच्या सेवेसाठीच पेटतात. प्रत्येक घरातून प्रेमाने तयार केलेली भाकरी आणि पिठलं माऊलींच्या चरणी अर्पण केल्याच्या भावनेने वारकऱ्यांना वाढले जाते. ग्रामस्थांच्या दृष्टीने अन्नदान ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून गजानन माऊलींच्या चरणी अर्पण केलेली निस्वार्थ भक्ती आहे.

टाळ-मृदंगाच्या निनादात आणि फुलांच्या सड्यावरून माऊलींच्या पालखीचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

महिलांनी आकर्षक रांगोळ्यांनी गाव सजवले होते, तर ग्रामस्थांच्या मुखी 'गण गण गणात बोते'चा अखंड जयघोष दुमदुमत होता. सेवा, श्रद्धा, समर्पण आणि ग्रामएकतेचे दर्शन घडविणारा हा अन्नदान सोहळा आजही गोविंदपूरची वेगळी ओळख बनला आहे.

परिसरातील हजारो भाविकांनी घेतला महाप्रसाद गजानन महाराजांच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी देवधानोरा, बोरगाव (बु.), गौरगाव, नागुलगाव, हासेगाव (शि.), एकुरका, जवळा खुर्द, बोरवंटी, भाटशिरपुरा, मंगरूळ, खामसवाडी, देवळाली, माळकरंजा आदी गावांसह परिसरातील हजारो भाविकांनी गोविंदपूरमध्ये गर्दी केली. २५ हजारांहून अधिक भाविकांनी रांगा लावून भक्तिभावाने पालखीचे दर्शन घेतले तसेच अन्नदानाचा प्रसाद स्वीकारला.

## अवैध गुटखा वाहतुक करणाऱ्यावर धाराशिव शहर पोलीसांची कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)-धाराशिव शहर पोलीस ठाणे- धाराशिव शहर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक दराडे यांना दि.१२.०७.२०२६ रोजी बातमी मिळाली की, स्कॉर्पिओ वाहन क्र एमएच २५ बी.एफ. ३६९६ मध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेला गोवा गुटख्याची वाहतुक होणार आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्यावरुन उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेशकुमार राउत पोलीस ठाणे धाराशिव शहर चे पथकाने तेरणा इंजिनिअरींग कॉलेज समोर हायवेवर धाराशिव येथे २३.४५ वा. सु. छापा टाकला असता स्कॉर्पिओ वाहन क्र एमएच २५ बी.एफ.३६९६ मध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेला गोवा गुटखा डायरेक्टर पान मसाला ४० गोण्या १८०० पॅकेट,SHOT LUXURY CHEWING TOBCCO चे ४० गोण्यात १८०० पॅकेट एकुण १०,३६,८०० व काळ्या रंगाची स्कॉरपिओ गाडी क्र एमएच २५ बी.एफ. ३६९६ असे एकुण २५,३६,८०० किंमतीचा माल मिळून आला. मिळून आलेला माल जप्त करुन माल सह आरोपी गणेश वय ३४ वर्षे, रा. उपळाई रोड एकता गणपती चौक बार्शी जि. सोलापूर, रोहन रविंद्र कदम रा. आळणी, जाफर जमादार रा. आळण राज्य कर्नाटक, अमोल गुंजाळ, पवन जिवन पौळ, रा. आळणी ता. जि. धाराशिव यांचे विरुध्द पोलीस ठाणे धाराशिव शहर येथे गुरनं ३१९/२०२६ भा.द.वि. सं. कलम १२३, २७४, २७५, २२३, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री सुरेशकुमार राउत यांचे मार्गदर्शनाखाली धाराशिव शहर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक श्री. दराडे, पोलीस अमंलदार माळी, पोलीस अमंलदार जाधवर यांच्या पथकाने केली आहे.

## अवैध मद्य विरोधी कारवाई

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे: आरोपी नामे-चंदा महादेव काळे, वय ३२ वर्षे, रा. पारधी पिढी भुम ता. भुम जि. धाराशिव या दि १३.०७.२०२६ रोजी १४.१० वा. सु.बसस्थानक भुम पाठीमागे मोकळ्या जागेत भुम येथे अंदाजे ८०० किंमतीची ८ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली.तर अश्विनी वय ३५ वर्षे, रा. पारधी पिढी भुम ता. भुम जि. धाराशिव या दि १३.०७.२०२६ रोजी १४.४० वा. सु.बसस्थानक भुम चे पाठीमागे मोकळ्या जागेत भुम येथे अंदाजे ८०० किंमतीची ०८ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर मनीषा वय ३० वर्षे, रा. पारधीपिडी भुम ता. भुम जि. धाराशिव या दि १३.०७.२०२६ रोजी १५.२५ वा. सु.बसस्थानकाचे बाजूला मोकळ्या जागेत अंदाजे ८०० किंमतीची ०८ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये भुम पो ठाणे येथे स्वतंत्र ३ गुन्हे नोंदविले आहेत.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## ऋतुमान बदलत आहे का?

वातावरणातील बिघाडीचा परिणाम मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. वातावरण दुषीत बनत आहे. याला जबाबदार मानव आहे. मानवाच्या चुकीमुळे एक ना एक दिवस मोठी किंमत मोजावी लागणार आहे असे दिसून येत आहे. राज्यात सध्याला दुष्काळजन्य स्थिती दिसून येत आहे. जूनला होणाऱ्या पेरण्या लांबल्या असून केवळ दहा टक्के पेरण्याझाल्याचे सांगण्यात येत आहे. पावसाचा पत्ता नाही. खाजगीत हवामानाचा अंदाज सांगणारे तोंडावर पडले असून जनतेची दिशाभुल केली आहे. निनोवाऱ्याचा परिणाम नाही, पाऊस पडेल असा अंदाज वर्तविला होतो. अंदाज हा अंदाजच असतो. त्याला खात्री देता येत नाही. मुळात हवामानाबाबत कळत नसेल तर चुकीचे मत व्यक्त करू नये. चुकीच्या माहितीमुळे मोठे नुकसान होते हे समजले पाहिजे. सध्याला वाढते जागतिक तापमानाचा अभ्यास जागतिक स्तरावर केला जात आहे. जगच वाळवंट होत आहे. जगात भारत असा देश आहे की, बाजूने समुद्र व एका बाजुने हिमालय आहे. हीम म्हणजे बर्फाळ भाग, या भागातून उन्हाळ्यात पूरजन्य स्थिती निर्माण होते. जगात असा एकमेव भारत देश आहे की, येथे तीन्ही ऋतू समसमान आहेत. यामुळे शेती उत्पादनामुळे भारताला कृषी प्रधान देश समजला जातो. आता कृषीचे उत्पादन घटत चालल्याने मोठी चिंता व्यक्त केली जात आहे. कृषीत उत्पादन वाढ काही प्रमाणात खुंटली आहे. याबाबत चिंतन केले तर एक बाब लक्षात येते की, भारतात हवामानाचा परिणाम होत आहे. ऋतूमानात बदलत आहे. उन्हाळ्यात पावुस पडत आहे. थंडी गायब होत आहे. उन्हाळ्यात जमीन ऊन्हामुळे तापली पाहिजे. असे असताना पावसाने गच्च होत आहे. मुळात निसर्गाला काय झाले हेच कळून येत नाही. निसर्गाचा ऱ्हास मानवचुकीमुळे होत आहे हे समजले असले तरी अजूनही तो थांबविला जात नाही. जनतेचे लक्ष नाही त्यापेक्षा सरकारचे दुर्लक्ष होत आहे. या दुर्लक्षेचा परिणाम नागरिकांना भोगावा लागत आहे. जनतेला काय कोणाचा धाक नसेल तर ते आणखीन ऱ्हास करणार! झाडे तोड अजूनही मोठ्या प्रमाणात केली जात आहेत. वातावरणात प्रदुर्षन कसे वाढेल या कडे कल दिसून येत आहे. पातळ प्लास्टीकचा वापर टाळा, असे सांगत असताना त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. पाण्याच्या प्लास्टीकच्या बाटल्याचा खच जमा होतो. मुळात प्लास्टीक जमीनीत मिसळत नाही, खत निर्माण होत नाही. हे माहिती आहे. निसर्गाचा ऱ्हास कोणत्या कारणामुळे होत आहे हे देशातील तमाम नागरिकांना माहिती आहे कारण देशातील जनता सुशिक्षित आहे. एक बाब लक्षात घेतली पाहिजे की, दरवर्षी वातावरणातीन बदल दिसून येत आहे. ऋतूमानात बदल होत आहे. हे दिसून येत आहे. दिड महिणा झाला पाऊस नाही. उन्हाळ्यासारखे उन्ह पडत आहे. हे लक्षण योग्य नाही. यामुळे पाण्याचा तुटवडा बरोबर अन्नधान्याचा तुटवडा होण्याची शक्यता आहे. पाणी व अन्नधान्याचा तुटवडा झाल्यास दुष्काळाची स्थिती निर्माण होते. सध्याला दुष्काळाची चाहुल लागली आहे. पेरण्या लांबल्या, पावसाअभावी पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर बनत आहे. शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या ठिकाणाची पाण्याची पातळी घसरत आहे. पुण्यासारख्या अफाट लोकसंख्येच्या ठिकाणी आता दहा दिवसाला पाणी पुरवठा करण्याचा निर्णय घेतला गेला आहे. राज्यात जवळपास सर्वच ठिकाणी पिण्याच्या पाण्याची समस्या कठिण होताना दिसून येत आहे. लातूर सारख्या ठिकाणी भिषण पाण्याची टंचाईने एकदा तर रेल्वेयेथून पाणी मागविण्याची वेळ आली होती. धाराशिवमध्ये उजणीयेथून पाईपलाईन टाकली मात्र मोठी हॉर्सपॉवरच्या विद्युत मोटारीचे बिल भरण्याची आडचण निर्माण होत आहे. अशा अनेक आडचणीस तोंड देवुन वाटचाल करावी लागत आहे. त्यामुळे शेती असो किंवा पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होणार आहे. असे दिसून येत आहे. सध्याला उन्हाळयासारखे उन्ह जाणवत आहे. एवढेच की, हवा असल्याचे उष्णतेची तिव्रता जाणवत नाही. बाकी उन्हाळ्यासारखी स्थिती दिसून येत आहे. त्यामुळे यातून काही शिकले पाहिजे. या स्थितीला जबाबदार कोण आहे याचा विचार केला पाहिजे. निसर्गाचा ऱ्हास होत आहे हे उघड्या डोळ्याने दिसून येत आहे तरी त्यावर उपायोजना केली जात नाहीत. पेरण्या दिड महिणा लांबल्या असल्याने आता पेरणी केल्यास हाताला लागेल असे नाही. उडीद-मुग पेरणीचा जवळपास मोसम गेल्यात जमा आहे. त्यामुळे सोयाबिनची पेरा काही ठिकाणी झाला असला तरी दुपारच्यावेळी माने टाकत आहेत. याठिकाणी पाऊस पडला नाही त्याठिकाणी दुबार पेरणीची गरज आहे. सात जुन मृगनक्षत्रावर पाऊस झाला नसल्याचा हा परिणाम आहे. पावसाळ्यात पावुस झाला तर पिके येतील, पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटेल, जनावरांना पाणी व चाऱ्याचा प्रश्न सुटेल, तोच मृगनक्षत्रावर पडला नाही, जूनमध्ये पाऊस पडला नाही तर मोठे संकट उभा राहात आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे बाबानो! निसर्गाचा आता तरी ऱ्हास करू नका, झाडे तोडू नका. पाण्याचा गैरवापर टाळा. झाडे लावण्यापेक्षा तोडण्याकडे कल अधिक दिसून येत आहे. वृक्षारोपनाचा केवळ देखावा होत आहे हे बंद करा. प्रामाणिकपणाने निसर्गाची जोपासना करा. निसर्गाचे संकट मोठे नाही, अजूनतरी संकट मर्यादित आहे. त्यावर मात करू शकतोत. त्यासाठी कठोर निर्बंधाची गरज आहे. कठोर पावले उचलण्याची गरज आहे. दिवसेंन दिवस ऋतूमानात बदल होत आहे हे नैसर्गिक मोठे संकट आहे. असाचा ऋतूमानात बदल होणार असेल तर दुष्काळजन्य स्थिती बरोबर काय पेरावे व कोणत्या महिण्यात पेरावे हे कळून येणार नाही. हे कळण्यात अनेक वर्ष घालावे लागतील. त्यामुळे आहे त्या परिस्थिती मात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नसता जीवसृष्टीच धोक्यात येण्याची शक्यता आहे. वरचेवर अनेक पक्षाच्या प्रजाती नष्ट होत आहेत.चिमण्याचे कमी प्रमाण असल्याने असेच चित्र राहीले तर चित्रावरच चिमण्या आगामी पिढीला दाखविण्याची परिस्थिती निर्माण होवू शकेल. त्यामुळे सावधान! वेळ गेलेली नाही. वृक्षारोपनाचा देखावा बंद करा. निसर्गाशी नाते जोडा, त्याला आपल्याशी करा...

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ : कर्जमुक्ती आता अधिक व्यापक




शेतकरीराजा आणि कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक असा निर्णय घेतला आहे. या योजनेची व्यापकता वाढवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पात्र शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार असल्याची घोषणा केली आहे याविषयी ही माहिती

शेतकरीबांधवांना सन्मानाने राजा म्हणून संबोधले जाते. तो जगाचा पोशिंदा आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेचा तो एक महत्त्वाचा कणा आहे. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी व महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच त्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊन कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक असा महानिर्णय घेतला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक कुशल प्रशासक, रयतेच्या कल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकाभिमुख शासक होत्या. शेती, सिंचन, जलसंधारण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही आदर्श मानले जाते. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना न्याय देण्याची त्यांची भूमिका होती. म्हणूनच त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या महत्त्वपूर्ण योजनेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना हे नाव देऊन शासनाने त्यांच्या कार्याला अभिवादन केले आहे.

शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी राज्य शासनाने यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ आणि महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना २०२२ जाहीर करुन शेतकऱ्यांना वेळोवेळी भरीव मदत केली आहे.

राज्यातील शेतकरी कर्जमुक्तीनंतरही थकीत कर्जाच्या दुष्टचक्रामध्ये अडकत असल्याचे दिसून येते. शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरुपी सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता म्हणून यादृष्टीने शिफारशी करण्यासाठी मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (मित्र) प्रविण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत केली होती.

या समितीने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीची आवश्यकता, शेतकऱ्यांवर वारंवार कर्जमाफीची वेळ का येते? त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य का निर्माण होत नाही? भविष्यात शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकू नयेत, शेतकरी सक्षम व्हावा याबाबत अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजना सुचविलेल्या आहेत. मात्र तातडीचा दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' ही ऐतिहासिक योजना असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना त्यांनी महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ५० हजार रुपयांचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर योजनेमध्ये ५० हजार रुपयांचा लाभ देण्याची मर्यादा काढून टाकण्यात आली आहे, अशा शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ मध्ये कर्जाची उचल करून वेळेत परतफेड करण्याची अट रद्द करण्याची घोषणा केली आहे.

राष्ट्रीयकृत, व्यापारी, खासगी आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे. पूर्वीच्या योजनेत दोन लाख रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता. मात्र, नव्या योजनेत दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असली तरी दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली जाणार आहे.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील पात्र शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीसाठी असलेली ५० हजार रुपयांची मर्यादा आणि २०२६-२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असला तरी कोणताही पात्र शेतकरी वंचित राहू नये, ही शासनाची भूमिका आहे.

कृषी क्षेत्रासाठी राज्य शासन दरवर्षी सुमारे ९५ हजार कोटी रुपयांचा खर्च करीत असल्याचे सांगताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांच्या वीजबिलासाठी २५ हजार कोटी रुपये खर्च केले जातात. कापसाची १३६ लाख क्विंटल खरेदी करून १० हजार ८८३ कोटी रुपयांचे चुकारे अदा करण्यात आले आहेत. सोयाबीनचे ६ लाख टन उत्पादन ३ हजार १९८ कोटी रुपयांना खरेदी करण्यात आले, तर कांदा खरेदीमुळे बाजारभाव स्थिर राहण्यास मदत झाली आहे. ठिबक सिंचनासाठी प्रलंबित २१७ कोटी रुपये लवकरच वितरित करण्यात येतील, तसेच कृषी समृद्धी योजनेतील उर्वरित निधी पुरवणी मागण्यांतून उपलब्ध करून दिला जाईल.

महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना ठरणार असून केवळ कर्जमाफी नाहीतर शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि शेती क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न या योजनेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

**– विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

# महिलांच्या सुरक्षितता व सक्षमीकरणासाठी 'सखी वन स्टॉप सेंटर' अधिक सक्षम करण्याचे निर्देश – मंत्री आदिती तटकरे

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्यातील महिलांच्या सुरक्षितता, संरक्षण व सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेल्या यंत्रणा अधिक सक्षम व परिणामकारक करण्याच्या दृष्टीने महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी मुंबईतील विविध संस्थांना भेट देऊन कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी महिला व बालविकास आयुक्त जगदीश मिनियार, विभागीय उपायुक्त सुवर्णा पवार तसेच गिरासे उपस्थित होते.



सर्वप्रथम मंत्री तटकरे यांनी केईएम, रुग्णालयातील 'सखी वन स्टॉप सेंटर'ला भेट देऊन तेथील सेवा व सुविधांची पाहणी केली. हिंसाग्रस्त आणि संकटग्रस्त महिलांना तातडीने, सन्मानपूर्वक व दर्जेदार सेवा मिळाव्यात, यासाठी केंद्रातील भौतिक सुविधांमध्ये आवश्यक सुधारणा करून दुरुस्तीची कामे तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

त्यानंतर त्यांनी कामा व अल्बलेस रुग्णालयातील नव्याने उभारण्यात आलेल्या 'सखी वन स्टॉप सेंटर'ची पाहणी केली. केंद्राचे सर्व काम पूर्ण झाले असून १ ऑगस्ट २०२६ पर्यंत हे केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच केंद्रातील रिक्त पदे तातडीने भरून आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत संबंधितांना सूचना करण्यात आल्या. त्यानुसार १ ऑगस्टपूर्वी सर्व रिक्त पदे भरण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

यानंतर मंत्री तटकरे यांनी महिला विकास मंडळ, कुलाबा येथील नोकरी करणाऱ्या महिलांच्या वसतिगृहाला भेट देऊन तेथील सुविधा, सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता व निवास व्यवस्थेची पाहणी केली. वसतिगृहातील एकूण व्यवस्था समाधानकारक असल्याचे त्यांनी नमूद करत, रहिवासी महिलांना अधिक दर्जेदार व सुरक्षित सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, महिलांच्या सुरक्षितता, संरक्षण आणि सक्षमीकरणासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. 'सखी वन स्टॉप सेंटर' तसेच कार्यरत महिलांच्या वसतिगृहांमार्फत महिलांना अधिक प्रभावी, सुलभ आणि गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्यावर शासनाचा भर राहील.

# मंत्रिमंडळ निर्णय (संक्षिप्त)



दापचरी येथे उभारणार आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार.
दुग्ध प्रकल्पाची ५५८.४३ हेक्टर जमीन देण्याचा निर्णय.
पालघर जिल्ह्यातील मौजे दापचरी ( ता.डहाणू) येथील दुग्ध प्रकल्पाची जमीन महाराष्ट्र राज्य कृषि पणन महामंडळास देण्यास मंजुरी. याठिकाणी आंतराष्ट्रीय दर्जाच्या कृषि बाजार उभारणीसह पणन विषयक सुविधा निर्माण करण्यात येणार. पालघर, ठाणेसह परिसरातील शेतकऱ्यांना सुविधेचा मोठा लाभ होणार.
(सहकार व पणन)

शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी मोठा दिलासा.
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६च्या निकषात सुधारणा. २०१९ च्या कर्जमाफी योजनेतील सुमारे १३ लाख शेतकऱ्यांसाठीची पन्नास हजार रुपयांपर्यंतची मर्यादा रद्द करून, नियमित कर्जमाफी. सन २०२६-२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द केल्याने २३ लाख शेतकऱ्यांनाही मिळणार प्रोत्साहनपर लाभ.
(सहकार व पणन विभाग)

राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालमत्तांसाठी मुद्रीकरण धोरण मंजुर. यामुळे मालमत्तांच्या वापरातून पारदर्शक आणि आणखी चांगले उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करता येणार. अल्पकालीन व दीर्घकालीन अशा नियोजनातून महापालिका, नगरपालिका, नगरपररिषदा, नगरपंचायतींना मिळकतीचे उपाय शोधता येणार.
(नगर विकास विभाग)

राज्यात केंद्र शासन पुरस्कृत अर्बन चॅलेंज फंड अभियान राबविण्यात येणार. शहरांना दर्जेदार पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी बाजाराधारित वित्तपुरवठा मिळविता येणार.
(नगर विकास विभाग)


बीड जिल्हा क्रीडा संकुलाच्या २४ कोटी ९५ लाख रुपयांच्या कामांना मंजुरी. क्रीडा संकुलात सिंथेटीक ॲथलेटीक ट्रॅक, फुटबॉल, हॉकी मैदान, व्हॉलीबॉल, कब्बडी, खोखो मैदान, इनडोअर हॉल इमारत अद्ययावतीकरण, वसतिगृहाच्या तिसऱ्या मजल्याचे बांधकाम, रेनवॉटर हार्वेस्टींग करणे, विविध खेळाची मैदानांचा समावेश.
(क्रीडा विभाग)

अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ अंतर्गत मुक्तबंदी व परिविक्षाधीन बंदी यांना देण्यात येणाऱ्या सहायक अनुदान योजनेच्या रक्कमेत दुप्पटीने वाढ. निर्दोष सुटलेल्या बंद्यांचा योजनेत समावेश करुन योजनेअंतर्गत सहायक अनुदान आता पंचवीस वरून पन्नास हजार रुपये इतकी वाढ.
(महिला व बाल विकास)

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या – एसटीच्या राज्यभरातील अतिरिक्त जागांचा विकास होणार. पीपीपी तत्वावर जिल्हा, तालुका व ग्रामीण भागातील बसस्थानक व महामंडळाच्या जागांचा विकास करण्यास मान्यता
(गृह – परिवहन विभाग)

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी
( महसूल व वन विभाग)

# बारामती रेल्वे स्थानकाच्या कायापालटाबद्दल उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडून पंतप्रधान आणि रेल्वेमंत्र्यांचे आभार



**मुंबई/प्रतिनिधी:** अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत बारामती रेल्वे स्थानकाचा ११.४० कोटी रुपये खर्चून जागतिक दर्जाचा पुनर्विकास करण्यात आल्याबद्दल उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे विशेष आभार मानले आहेत. हे अद्ययावत स्थानक लवकरच राष्ट्राला समर्पित केले जाणार आहे.

या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी खासदार असताना आणि दिवंगत अजित पवार हे उपमुख्यमंत्री असताना त्यांनी सातत्याने केंद्र सरकार व रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या या संयुक्त प्रयत्नांना यश आले असून बारामतीकरांचे आधुनिक रेल्वे स्थानकाचे स्वप्न आता पूर्ण झाले आहे.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, १९१४ पासूनचा इतिहास असलेल्या या स्थानकाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर झाल्यानंतर आता झालेले हे आधुनिकीकरण बारामतीच्या प्रगतीला नवी गती देईल. रोज अंदाजे १,८०० प्रवाशांची वाहतूक करणाऱ्या या स्थानकावर आता दिव्यांग-अनुकूल सुविधा, आधुनिक प्रतीक्षा कक्ष, पार्किंग आणि सुंदर प्रादेशिक स्थापत्य शैलीचा मिलाफ पाहायला मिळत आहे.

बारामती हे राज्याचे प्रमुख कृषी, शैक्षणिक व औद्योगिक केंद्र असल्याने या जागतिक दर्जाच्या सुविधांमुळे स्थानिक व्यापार, दळणवळण आणि पर्यटन स्थळांना मोठी चालना मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.



# पेपरफुटीला जबाबदार कोण?

शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बाळगून राज्यातील लाखो युवक-युवती शिक्षक पात्रता परीक्षा देण्यासाठी अनेक महिन्यांपासून अहोरात्र मेहनत घेत होते. अभ्यास, आर्थिक नियोजन, प्रवासाची तयारी आणि मानसिक ताण सहन करत परीक्षा केंद्रावर पोहोचण्याच्या तयारीत असतानाच परीक्षा रद्द झाल्याची बातमी समोर आली. या निर्णयामुळे लाखो उमेदवारांच्या स्वप्नांवर जणू पाणी फेरले गेले.

परीक्षा रद्द करण्यामागील कारण काहीही असो, परंतु त्याचा सर्वाधिक फटका प्रामाणिक आणि मेहनती विद्यार्थ्यांनाच बसला आहे. अनेक उमेदवारांनी खासगी नोकरीतून रजा घेतली, काहींनी प्रवासासाठी हजारो रुपये खर्च केले, तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी राहण्याची व्यवस्था करून परीक्षा देण्याची तयारी केली होती. या सर्वांचे आर्थिक आणि मानसिक नुकसान कोण भरून काढणार, हा प्रश्न आज प्रत्येक उमेदवार विचारत आहे. राज्यात विविध स्पर्धा परीक्षांमध्ये प्रश्नपत्रिका फुटणे, गैरव्यवहार आणि परीक्षा रद्द होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होत आहे. स्पर्धा परीक्षांची विश्वासार्हता टिकवणे ही शासन आणि संबंधित यंत्रणांची प्राथमिक जबाबदारी आहे. प्रत्येक वेळी परीक्षा रद्द करून प्रामाणिक विद्यार्थ्यांना वेठीस धरणे हा कोणत्याही समस्येचा कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते परीक्षा केंद्रापर्यंत पोहोचविण्याच्या प्रक्रियेत




अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा, डिजिटल ट्रॅकिंग, गोपनीयतेचे कठोर नियम आणि जबाबदारी निश्चित करणारी सक्षम व्यवस्था उभारणे ही काळाची गरज आहे. तसेच, अशा गैरप्रकारांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींवर जलदगतीने कठोर कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे. दोषींना शिक्षा झाली तरच भविष्यात अशा घटना टाळता येतील. टीईटी परीक्षा ही केवळ एक परीक्षा नसून हजारो कुटुंबांच्या आशा-आकांक्षांशी जोडलेली आहे. शिक्षक होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अनेक उमेदवार वर्षानुवर्षे तयारी करतात.


त्यामुळे परीक्षा रद्द करण्याचा निर्णय हा शेवटचा पर्याय असावा; मात्र जर तो अपरिहार्य असेल, तर उमेदवारांचे नुकसान कमी करण्यासाठी फेरपरीक्षेची तारीख तातडीने जाहीर करणे, परीक्षा शुल्काबाबत योग्य निर्णय घेणे आणि संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक ठेवणे आवश्यक आहे.आज गरज आहे ती केवळ परीक्षा घेण्याची नाही, तर विद्यार्थ्यांचा विश्वास जिंकण्याची. शिक्षण व्यवस्थेचा पाया मजबूत ठेवायचा असेल, तर परीक्षा व्यवस्थाही तितकीच मजबूत, पारदर्शक आणि भ्रष्टाचारमुक्त असणे आवश्यक आहे. लाखो उमेदवारांच्या भविष्याशी खेळ करणार्यांवर कठोर कारवाई झाली, तरच अशा घटनांना आळा बसेल. टीईटी परीक्षा रद्द होणे ही केवळ प्रशासकीय घटना नाही; ती राज्याच्या परीक्षा व्यवस्थेपुढे उभे राहिलेले गंभीर आव्हान आहे. या घटनेतून शासन, परीक्षा परिषद आणि संबंधित यंत्रणांनी धडा घेऊन भविष्यात कोणत्याही विद्यार्थ्याच्या आयुष्याशी असा खेळ होणार नाही, याची हमी देणे हीच काळाची खरी गरज आहे.

**शशिकांत आलडवाड : मो : ७७९८५११७१५**

# जिरे आणि ओवा एकत्र खा आणि या समस्यांना पळून लावा

प्रज्ञा घोगळे-निकम

स्वयंपाक घरातील मसाल्याच्या भांड्यात मेथी, जिरे आणि ओवा हे मसाले हमखास असतात. कारण या मसाल्यांमुळे जेवणाची चव वाढण्यास मदत होते. विशेष म्हणजे हे जेवढी जेवणाची चढ वाढवतात तेवढेच हे आरोग्यासाठी देखील उत्तम असतात. त्यामुळे याचा आहारात हमखास वापर केला जातो. मात्र, हेच मसाल्याचे तीनही प्रकार एकत्र खाल्यास अनेक समस्या दूर होण्यास मदत होते. चला तर जाणून घेऊया हे तीनही जिन्नस एकत्र खाल्लाने कोणकोणत्या समस्या दूर होण्यास मदत होते.



गॅस कमी होतो

मेथी, ओवा आणि जिरे फ्लेव्होनॉइड अँटीऑक्सिडंट्स सारख्या दाहक-विरोधी गुणधर्मांनी समृद्ध असतात. यामध्ये असलेले अँटिऑक्सिडंट शरीरातील जळजळ कमी करण्यासाठी प्रभावी ठरू शकतात. याशिवाय, हा एक चांगला दाहक-विरोधी एजंट आहे जो शरीराची जळजळ कमी करू शकतो. या तिन्हींच्या मिश्रणाने पोटातील गॅस आणि ॲसिडिटीपासून आराम मिळू शकतो.

एक्झामाची लक्षणे कमी होतात

एटोपिक डर्माटायटीस किंवा एक्जिमा ही अशी स्थिती आहे ज्यामुळे त्वचेवर पुरळ आणि जळजळ होते. याशिवाय एक्जिमामुळे जळजळ, खाज सुटणे, त्वचेला भेगा पडणे, खडबडीत त्वचा होणे. या सर्व समस्यांमध्ये मेथी जिरे आणि ओवा दाणे तुमच्यासाठी प्रभावी ठरू शकतात. यामध्ये असलेले गुणधर्म एक्जिमापासून आराम देऊ शकतात.

त्वचेवरील पांढरे डाग

मेथी, ओवा आणि जिरे यांच्या मिश्रणाने तयार केलेली पेस्ट लावल्यास त्वचेवरील पांढरे डाग किंवा ल्युकोडर्मा ग्रस्त भागांपासून आराम मिळू शकतो.

वजन कमी करण्यात प्रभावी

मेथी, ओवा आणि जिरे यांचे मिश्रण आपल्या शरीरातील चयापचय गती वाढवू शकते. हे मिश्रण आपल्या शरीरातील अतिरिक्त चरबी जाळण्यास मदत करते. तुमच्या दैनंदिन जीवनात या मिश्रणाचा नियमित समावेश करून तुम्ही वाढत्या शरीराचे वजन नियंत्रित करू शकता. तसेच, यामुळे शरीराची वाढती जळजळ कमी होऊ शकते.

मधुमेहावर होते नियंत्रण

मेथी, ओवा आणि जिरे यांचे मिश्रण शरीरातील इन्सुलिनची पातळी नियंत्रित ठेवण्यास उपयुक्त ठरू शकते. यात मधुमेहविरोधी गुणधर्म आहेत. ज्यामुळे शरीरातील इन्सुलिनची पातळी कमी होऊ शकते. याच्या मदतीने तुम्ही मधुमेहाच्या समस्यांवर नियंत्रण ठेवू शकता.

खाज सुटणे

मेथी, ओवा आणि जिऱ्यामध्ये जंतुनाशक गुणधर्म असतात. जे तुम्हाला खाजेवर फायदेशीर ठरू शकतात. हे तुमच्या त्वचेवर होणार्या अनेक प्रकारच्या जीवाणू आणि संसर्गाच्या समस्यांपासून आराम देऊ शकते. त्याच वेळी, अंतर्गत समस्या कमी करण्यासाठी, तुम्ही हे मिश्रण पाण्यात घालून पिऊ शकता. यातून तुम्हाला खूप फायदा होईल.

मेथी, जिरे आणि अजवाईन शरीरातील समस्या कमी करू शकतात. परंतु, लक्षात ठेवा की जर तुम्हाला कोणत्याही प्रकारची समस्या असेल तर डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतरच या मिश्रणाचे सेवन करा.

# सुंदर आणि मऊ
## ओठांसाठी काही महत्वाचे

सुंदर आणि मऊ ओठ प्रत्येकाच्याच चेहऱ्याचे सौंदर्य खुलवतात. पण बदलणारे हवामान, प्रदूषण, पुरेसे पाणी न पिणे आणि योग्य काळजी न घेणे यामुळे ओठ अनेकदा कोरडे, काळे आणि फाटलेले दिसू लागतात. ओठांची त्वचा आपल्या चेहऱ्याच्या त्वचेपेक्षा खूप पातळ आणि संवेदनशील असते, कारण ओठांवर तेल ग्रंथी नसतात. त्यामुळे त्यांना अतिरिक्त ओलावा आणि पोषणाची गरज असते.

मऊ आणि गुलाबी ओठांसाठी घरगुती उपाय आणि योग्य जीवनशैली खालीलप्रमाणे आहे:

१. मृत त्वचा काढून टाकणे


ओठांवर जमा झालेली मृत त्वचा काढण्यासाठी आठवड्यातून दोनदा ओठ हलके घासणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे ओठांचा रक्तप्रवाह सुधारतो आणि ते मऊ होतात.

मध आणि साखर: एक चमचा साखरेमध्ये थोडे मध मिसळून ओठांवर २-३ मिनिटे हलक्या हाताने चोळा. साखरेमुळे मृत त्वचा निघून जाते आणि मध ओठांना मऊ बनवते.

दूध आणि हळद: दुधाची साय आणि चिमूटभर हळद एकत्र करून ओठांवर लावल्याने ओठांचा काळेपणा कमी होऊन ते गुलाबी होतात.

२. ओलावा टिकवून ठेवणे

ओठांना कधीही कोरडे पडू देऊ नका. दिवसभरात आणि विशेषतः रात्री



झोपताना ओठांना ओलावा देणे गरजेचे आहे.

नारळाचे तेल किंवा तूप: रात्री झोपण्यापूर्वी ओठांवर थोडे शुद्ध तूप किंवा खोबरेल तेल लावा. यामुळे ओठांना खोलवर पोषण मिळते आणि सकाळी उठल्यावर ओठ मऊ लागतात.

कोरफड रस: कोरफडीमध्ये नैसर्गिक ओलावा देणारे गुणधर्म असतात. ताजी कोरफड ओठांवर लावल्याने फाटलेल्या ओठांची समस्या दूर होते.

३. शरीरातील पाण्याचे प्रमाण राखणे

केवळ वरून मलमे लावल्याने ओठ सुंदर होत नाहीत, तर शरीर आतून सजल असणे गरजेचे आहे.

भरपूर पाणी प्या: दिवसभरात किमान ८ ते १० प्याले पाणी प्या. शरीरात पाण्याची कमतरता झाल्यास त्याचा थेट परिणाम ओठांवर होतो आणि ते कोरडे पडतात.

फळे आणि भाज्या: आहारात रसदार फळे (जसे की टरबूज, संत्री) आणि हिरव्या पालेभाज्यांचा समावेश करा, ज्यामुळे शरीराला आवश्यक जीवनसत्त्वे मिळतात.

४. काही महत्त्वाच्या आणि चांगल्या सवयी

ओठांना जीभ लावणे टाळा: अनेकदा ओठ कोरडे पडल्यावर आपण त्यावर जीभ फिरवतो. लाळेमधील घटकांमुळे ओठ अधिक कोरडे आणि काळे पडतात. त्यामुळे ही सवय त्वरित बदला.

उत्कृष्ट दर्जाचे ओठ मलम: नेहमी सूर्यकिरणांपासून संरक्षण देणारे आणि रसायने नसलेले नैसर्गिक ओठ मलम वापरा.

रात्री सौंदर्य प्रसाधने काढा: झोपण्यापूर्वी ओठांवर लावलेला रंग किंवा इतर कोणतेही सौंदर्य प्रसाधन व्यवस्थित स्वच्छ करा. ओठांना रंग लावून झोपल्याने ओठांचे आरोग्य बिघडते.

५. नैसर्गिक घरगुती लेप

बीट रस: ओठांना नैसर्गिक गुलाबी रंग हवा असल्यास बेटाचा रस किंवा त्याचा तुकडा ओठांवर चोळा. बीटमध्ये नैसर्गिक रंगद्रव्ये असतात जी ओठांचा काळेपणा नैसर्गिकरीत्या दूर करतात.

गुलाबाच्या पाकळ्या आणि दूध: गुलाबाच्या पाकळ्या दुधात भिजवून त्याची घट्ट चटणी बनवा आणि ओठांवर १०-१५ मिनिटे लावा. यामुळे ओठांना छान तजेला येतो.

निष्कर्ष:

सुंदर आणि मऊ ओठ मिळवणे फार कठीण नाही, फक्त त्यासाठी नियमितता हवी. बाजारातील रासायनिक उत्पादनांऐवजी घरगुती आणि नैसर्गिक उपायांना प्राधान्य दिल्यास ओठांचे सौंदर्य दीर्घकाळ टिकून राहते. रोज रात्री ओठांची काळजी घेण्याचा छोटासा नियम पाळला, तर तुमचे ओठ नेहमीच निरोगी आणि मऊ राहतील.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

**ग्रीन टी**–जेव्हा मोठया प्रमाणात स्वास्थ्य लाभ हवा असेल आणि तो कशानी मिळेल असा जर कुणी प्रश्न केला तर सर्वात वरच्या क्रमांकावर ग्रीन टीचे नाव येईल. ग्रीन टी तुम्हाला सुंदर बनवते. कॅंसर पासुन दुर ठेवते शिवाय तुमच्या त्वचेला स्वच्छ देखील ठेवते आणि तुमच्या चेहे-याला लागणा-या आवश्यक तत्वांनाही पुर्ण करते.जे लोक सतत ३ महिने ग्रीन टी चे सेवन करतात त्यांची त्वचा ग्रीन टी चे सेवन न करणा-यांच्या तुलनेत जास्त मुलायम स्वस्थ आणि कोमल असते. आणि हे सर्व याकरता होतं कारण यात महत्वपुर्ण तत्व जसे कैटेचीन, एऋउऋ असतात जे आपल्या शरीरात ऑक्सीजनच्या प्रवाहाला वाढवतात आणि त्वचेत रक्ताच्या कमतरतेला भरून काढतात.




## २ Joke विनोद




बगारामला एकदा एका जुन्या पडक्या इमारतीत रात्र घालविण्याचा प्रसंग आला. वॉचमनला बगारामने विचारले, काय रे बाबा, इथे या खोलीत काही विशेष घटना घडली आहे का ? गेल्या २५ वर्षात तरी नाही घडलेली वॉचमन म्हणाला, म्हणजे २५ वर्षांपुर्वी काय विशेष घडले होते ? बगारामने उत्सुकतेने विचारले. वॉचमन म्हणाला, २५ वर्षापूर्वी एक माणूस इथे याच खोलीत रात्रभर राहिला आणि सुखरुप घरी निघून गेला होता.

## ३ Message संदेश



Pappu: Papa ghar mein mehmaan aae hain aur sharabat bnaane ke lie nemboo nahin hai, ab kya karoon? Santa: abe, darata kyon hai? nae Vim Baar mein 100 neemboo kee shakti hai, daal de 2 boond beta!.

## ४ Thought सुविचार



प्रयास हा प्रतिभेचा प्राणवायू आहे.


– पु.ल. देशपांडे

**संस्कृत सुभाषित**

काव्यशास्त्र विनोदेन कालो गच्छति धीमताम्।
व्यसने च मुर्खाणां निद्रया कलहेन वा।।

अर्थ –बुद्धिमान लोकांचा वेळ काव्य, शास्त्र, विनोदात (विद्याप्राप्ती करण्यात, चिंतन करण्यात, चांगल्या चर्चा करण्यात आदी) व्यतीत होतो, तर व्यसनात, झोपेत किंवा भांडणात मुर्खांचा वेळ जातो.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. उथळ पाण्याचा आवाज
४. नीच, पापी, दुष्ट
७. विश्रांती
१०. मळलेला
११. उफाड्याचा (बांधा)
१३. प्रामाणिक
१५. अवास्तव
१६. मिठी
१७. गावबाहेरची वस्ती
१९. तालासुराची गट्टी
२०. खाली पडू न देता, नेहमी
२१. चेहऱ्यावरील तेज
२३. प्रफुल्लित
२६. बारा वर्षांचा काळ
२८. लहान
२९. पाणकोंबडा
३०. दिखाऊ, खोलवर नसलेले
३३. चाणक्यकालीन तक्षशिला बरोबरचे एक विद्यापीठ
३५. रहस्य
३७. लोखंड घासण्याचे साधन
३९. फिरणे, चक्कर येणे
४२. अपमान
४३. लक्ष्मीचे एक नाव
४५. युवराज
४६. एकरूप
४८. बडबड
५०. चंद्र
५३. प्रश्न
५५. नवीन आलेला
५७. मृत्यू नसलेला
५८. जंगली
६०. निकट
६१. अनुमती
६३. फणसाचा एक प्रकार
६५. पाप
६८. वितरण
७०. दोन महान ग्रंथ
७२. मगज
७३. उद्याच्या नंतरचा दिवस
७४. कणीदार
७५. मोठी बहीण
७६. विठ्ठलाची पत्नी
७७. नाराजी

### उभे शब्द

१. ताकीद देणे, समज देणे
२. खंड
३. ताणलेल्या दोरीचा आवाज
४. तानाजीला मिळालेली पदवी
५. हिंमत
६. कपाळभर लावलेले कुंकू
७. कहाणीतील गाव
८. दीर्घ उच्चराने नरम
९. भ्रम
१४. नवरदेव
१५. इंद्रिय
१८. जरा उणीच!
२२. वेदना
२४. व्रत,२५. पूजेचे नक्षीदार ताट
२५अ. जहाज लुटणारे
२७. खाट, बाज
३०. सिंह, जगलाचा राजा
३१. आवड
३२. रमापती
३४. दरवाजा
३६. सापाची एक जात
३८. नीच, दुष्ट
४०. नामघोष
४१. भारुड काव्य प्रकारात रचना केलेले संत,४२. अवस
४४. मानी स्त्री
४५. राजाची पत्नी
४६. षष्ठीची देवता
४७. पावसाची धार
४८. देश, जमीन
४९. अरण्य
५१. आगबोट
५२. द्वाड, खोडकर
५३. युद्ध
५४. एक सुगंधी वनस्पती
५६. धुसफूस, त्रास
५७. पुष्कळ, खूप
५८. संतापी
५९. समीक्षा
६२. बाजेची कापडी पट्टी
६४. मर्यादा, सीमा
६५. विजार
६६. पंकज
६७. छोटे जाजम
६९. केशरी गराचे स्वस्त फळ
७१. कधी खरे, कधी खोटे ठरणारे!
७२. मासा पकडण्याचे साधन

### आडवे उत्तरे

१.खळखळाट ४.नराधम ७.आराम १०.मळकट ११.उभार १३.साव १५.अवाजवी १६.कव १७.पाडा १९.साम २०.वरचेवर २१.रया २३.टवटवीत २६.तप २८.सान २९.बदक ३०.वरवरचे ३३.नालंदा ३५.गमक ३७.कानस ३९.गरगरणे ४२.अवहेलना ४३.रमा ४५.राजकुमार ४६.समरस ४८.वटवट ५०.रजनीनाथ ५३.समस्या ५५.नवागत ५७.अमर ५८.रानटी ६०.जवळ ६१.परवानगी ६३.कापा ६५.पातक ६८.वाटप ७०.रामायण महाभारत ७२.गर ७३.परवा ७४.रबाळ ७५.ताई ७६.रखमाई ७७.इतराजी

### उभे उत्तरे

१.खडसावणे २.बळ ३.तलवार ४.नरवीर ५.धमक ६.मळवट ७.आटपाटनगर ८.मग ९.करमणूक १२.भास १४.वर १५.अवयव १८.डावी २२.यातना २४.वसा २५.तबक २५अ.चाचे २७.पलंग ३०.वनराज ३१.रस ३२.रमावर ३४.दार ३६.मणेर ३८.हलकट ४०.गजर ४१.एकनाथ ४२.अमावस्या ४४.मानिनी ४५.राणी ४६.सटवाई ४७.सर ४८.वतन ४९.वन ५१.जहाज ५२.नाठाळ ५३.समर ५४.मरवा ५६.तणतण ५७.अपरंपार ५८.रागीट ५९.टीका ६२.नवार ६४.पारावार ६५.पायजामा ६६.कमळ ६७.सतरंजी ६९.पपई ७१.भाकीत ७२.गळ



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### इंग्लंडच्या ७ व्या विकेटचा थरार



दिल्ली–भारत आणि इंग्लंड यांच्यातील तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील पहिल्या सामन्यात इंग्लंडने भारतीय गोलंदाजांना चांगलीच झुंज दिली. एका वेळी अवघ्या १०७ धावांत ६ गडी गमावून संकटात सापडलेल्या इंग्लंडने, सातव्या विकेटसाठी झालेल्या शतकी भागीदारीच्या जोरावर सामन्यात पुनरागमन केले आहे. भारतासमोर आता विजयासाठी २५९ धावांचे आव्हान आहे.

इंग्लंडचा डाव: सुरुवातीला पडझड, नंतर सावरले नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारणाऱ्या इंग्लंडची सुरुवात ठीकठाक झाली होती. बेन डकेट (४६) आणि जेकब बेथेल (१४) यांनी पहिल्या विकेटसाठी ६१ धावा जोडल्या होत्या. मात्र, ही जोडी फुटल्यानंतर इंग्लंडचा डाव गडगडला. अवघ्या १०७ धावांत इंग्लंडचे ६ मुख्य फलंदाज तंबूत परतले होते, ज्यामुळे संघ १५०–१८० धावांच्या आत आटोपेल असे वाटत होते. जसप्रीत बुमराहने हॅरी ब्रूकची तर इतर गोलंदाजांनी बटलर, सॅम करन आणि विल जॅक्स यांना स्वस्तात बाद करत भारताची पकड मजबूत केली होती.

### ''हाच संघ जिंकणार फिफा वर्ल्ड कप २०२६'

टेक्सास–फिफा विश्वचषक २०२६ च्या उपांत्य फेरीच्या सामन्यापूर्वी, दिग्गज जर्मन गोलरक्षक ऑलिव्हर कान यांनी भविष्यवाणी केली आहे की, उर्वरित चार संघांपैकी एक संघ ही स्पर्धा जिंकेल. ऑलिव्हर कान यांच्या मते, फ्रान्स हा फिफा विश्वचषक २०२६ जिंकण्यासाठी एक प्रबळ दावेदार आहे. त्यांचा विश्वास आहे की, संघातील संतुलन आणि शेवटच्या क्षणी सामन्याचे चित्र पालटण्याच्या क्षमतेमुळे, कोणत्याही संघाला फ्रान्सला हरवणे सोपे जाणार नाही.२०२६ फिफा विश्वचषकाचा पहिला उपांत्य फेरीचा सामना बुधवार, १५ जुलै रोजी डॅलस स्टेडियमवर फ्रान्स विरुद्ध स्पेन यांच्यात खेळला जाईल. दुसरा उपांत्य फेरीचा सामना इंग्लंड आणि अर्जेंटिना यांच्यात होईल. यापूर्वी २००६ मध्ये १६ संघांच्या फेरीत फ्रान्स आणि स्पेन एकमेकांसमोर आले होते, ज्यात फ्रान्सने ३–१ ने विजय मिळवला होता. जी५ च्या शोवर बोलताना ऑलिव्ह कान म्हणाले, ''आतापर्यंतच्या कामगिरीच्या आधारावर जर मला एका संघाची निवड करायची असेल, तर मी कदाचित फ्रान्सची निवड करेन. संतुलन, संघातील खेळाडूंची संख्या आणि वेगवेगळ्या प्रकारे सामने जिंकण्याच्या क्षमतेच्या बाबतीत ते सर्वोत्तम संघ वाटतात. तथापि, या चार संघांमध्ये फारसा फरक नाही आणि त्यांच्यापैकी कोणताही संघ विश्वचषक जिंकू शकतो.''

### रोहित-विराट पहिल्या सामन्यासाठी सज्ज !

मुंबई–भारत आणि इंग्लंड यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका आज (१४ जुलै) पासून सुरू होत असून, पहिला सामना बर्मिंगहॅम येथील एजबॅस्टन क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे. टी–२० मालिकेत झालेल्या निराशाजनक पराभवानंतर भारतीय संघाला मालिका बरोबरीत आणण्याची संधी आहे. भारताने एकदिवसीय क्रिकेटमध्ये इंग्लंडवर सातत्याने आपले वर्चस्व कायम राखले आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यात आतापर्यंत ११० एकदिवसीय सामने खेळले गेले आहेत. त्यापैकी भारताने ६१, तर इंग्लंडने ४४ सामने जिंकले आहेत. तीन सामने अनिर्णित राहिले असून, दोन सामन्यांचा निकाल लागलेला नाही. इंग्लंडमध्ये भारत आणि इंग्लंड यांच्यात आतापर्यंत एकूण ४४ सामने खेळले गेले आहेत. यात भारताने १६, तर इंग्लंडने २३ सामने जिंकले आहेत. एका सामन्याचा निकाल लागलेला नाही, तर दोन सामने अनिर्णित राहिले आहेत. भारताची सर्वात मोठी समस्या त्यांची कमकुवत फलंदाजी होती, ज्यामुळे एकदिवसीय सामन्यांमध्ये फलंदाजांकडून उत्कृष्ट कामगिरीच्या अपेक्षा वाढल्या होत्या.

### १२७ किलोचा क्रिकेटर, एका कॅचने बनला वर्ल्ड कपचा हिरो

मुंबई –२००७ चा वन–डे वर्ल्ड कप भारतीय संघासाठी अत्यंत निराशाजनक आणि वेदनादायी ठरला असला, तरी या विश्वचषकात एका अशा खेळाडूने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते, ज्याची चर्चा आजही क्रिकेट जगतात केली जाते. तो खेळाडू म्हणजे बर्म्युडाचा ड्वेन लेवरॉक. १९ मार्च २००७ रोजी टीम इंडिया विरुद्ध झालेल्या सामन्यात ड्वेन लेवरॉकने घेतलेला एक अद्भूत कॅच क्रिकेट इतिहासातील सर्वात सर्वोत्तम कॅचपैकी एक मानला जातो. आज १४ जुलै रोजी त्यांचा वाढदिवस असून, या निमित्ताने त्यांच्या त्या ऐतिहासिक कामगिरीची आणि सध्या ते काय करत आहेत याची जोरदार चर्चा रंगली आहे. भारताविरुद्धच्या सामन्यात जेव्हा ड्वेन लेवरॉक स्लिपमध्ये फिल्डिंग करत होते, तेव्हा त्यांनी भारताचा फलंदाज रॉबिन उथप्पाचा हवेत सूर मारत एका हाताने अप्रतिम कॅच घेतला. सुमारे १२७ किलो वजन असलेल्या लेवरॉकची ही चपळाई पाहून मैदान, खेळाडू आणि प्रेक्षक सगळेच अवाक झाले. डेव्हिड लॉयड यांनी केलेले उद्गार आजही चाहत्यांच्या कानात गुंजतात, कॅच घेतल्यानंतर ड्वेन लेवरॉक यांनी मैदानावर धावत सुटत केलेला जल्लोष प्रचंड व्हायरल

# भारत विरुद्ध इंग्लंड पहिला वनडे सामना!

## ९६७ दिवसांनंतर मैदानात उतरणार टीम इंडियाची त्रिमूर्ती

बर्मिंगहॅम,१४ जुलै (पीएसआय) भारत आणि इंग्लंड क्रिकेट संघातील तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील पहिला सामना आज, १४ जुलै रोजी खेळला जाईल. दोन्ही संघांमधील हा सामना बर्मिंगहॅम येथील एजबास्टन स्टेडियमवर भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी ३:३० वाजता सुरु होईल. टी–२० मालिकेत ४–० नं पराभव झाल्यानंतर, शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ वनडे मालिकेत जोरदार पुनरागमन करण्याच्या प्रयत्नात असेल. दुसरीकडे, हॅरी ब्रूकच्या नेतृत्वाखालील इंग्लंड संघ आपली विजयी मालिका कायम ठेवण्याचा प्रयत्न करेल. विशेष म्हणजे रोहित शर्मा, विराट कोहली आणि जसप्रीत बुमराह यांच्या मालिकेत पुनरागमनामुळं सामना आणखी रोमांचक होण्याची अपेक्षा आहे. हे तिघंही तब्बल ९६७ दिवसांनी एकत्र खेळताना दिसणार आहेत.



कोहली सात महिन्यांनंतर दिसणार संघात : अलीकडेच, जूनमध्ये जेव्हा भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात तीन सामन्यांची वनडे मालिका खेळली गेली होती, तेव्हा रोहित शर्मा आणि विराट कोहली यांची संघात निवड झाली होती, परंतु मालिका सुरु होण्यापूर्वीच दुखापतीमुळं विराट कोहलीला बाहेर व्हावं लागलं. आता १४ जुलै रोजी होणाऱ्या पहिल्या वनडे सामन्यात भारत आणि इंग्लंड आमने–सामने येतील तेव्हा कोहली संघात दिसेल. कोहलीनं आपला शेवटचा वनडे सामना १८ जानेवारी २०२६ रोजी खेळला होता. त्यावेळी भारत आणि न्यूझीलंड यांच्यात वनडे मालिका खेळली जात होती.

२०२३ नंतर बुमराह खेळणार पहिला वनडे सामना : गेल्या वनडे मालिकेत रोहित शर्मा देखील टीम इंडियाचा भाग होता, पण जसप्रीत बुमराह खूप मोठ्या कालावधीनंतर वनडे सामन्यांमध्ये खेळणार आहे. जसप्रीत बुमराह आपला शेवटचा वनडे सामना १९ नोव्हेंबर २०२३ रोजी, २०२३ च्या वनडे विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात खेळला होता. त्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं टीम इंडियाचा पराभव करुन त्यांचं स्वप्न भंग केलं होतं. तेव्हापासून बुमराह कोणताही वनडे सामना खेळलेला नाही. पुढचा वनडे सामना आज १४ जुलै रोजी होणार आहे. जर आपण १९ नोव्हेंबर २०२३ पासून दिवस मोजले, तर हे ९६७ दिवस होतात. आता, पुढच्या सामन्यात सर्व काही सुरळीत पार पडल्यास, हे तिन्ही खेळाडू तितक्याच दिवसांसाठी मैदानावर एकत्र दिसतील.

दोन्ही संघांचा हेड टू हेड रेकॉर्ड कसा : वनडे क्रिकेटमध्ये आतापर्यंत टीम इंडिया आणि इंग्लंड यांच्यात एकूण ११० सामने खेळले गेले आहेत. या कालावधीत टीम इंडियानं ६१ सामने जिंकले आहेत, तर इंग्लंडनं ४४ सामने जिंकले आहेत. दोन सामने बरोबरीत सुटले, तर तीन सामन्यांचा निकाल लागला नाही. दोन्ही संघांनी इंग्लंडच्या भूमीवर ४५ वनडे सामने खेळले आहेत, ज्यात इंग्लंडनं २३, तर भारतानं १८ सामने जिंकले आहेत. एक सामना बरोबरीत सुटला आणि तीन सामने अनिर्णित राहिले.

खेळपट्टी कशी असेल : येथील खेळपट्टी फलंदाजांसाठी अनुकूल मानली जाते. मात्र, सुरुवातीच्या षटकांमध्ये वेगवान गोलंदाजांना स्विंग आणि सीम मूव्हमेंटचा अनुभव येण्याची शक्यता आहे. जर फलंदाजांनी सुरुवातीला सावधपणे खेळले, तर ते नंतर सहजपणे मोठे फटके मारु शकतात. दुसऱ्या डावात दव देखील महत्त्वाची भूमिका बजावू शकते, त्यामुळं नाणेफेक जिंकणारा संघ प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेऊ शकतो.


सामना कधी आणि कुठं पाहायचा : भारतीय संघ आणि इंग्लंड यांच्यातील पहिला वनडे सामना आज, १४ जुलै रोजी बर्मिंगहॅम येथील एजबास्टन स्टेडियमवर भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी ३:३० वाजता सुरु होईल. नाणेफेक सामना सुरु होण्याच्या ३० मिनिटं आधी, म्हणजेच भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी ३:०० वाजता होईल.



### द्रविड इंग्लंड कसोटी संघाचे मुख्य प्रशिक्षक होणार?

लंडन : भारतीय संघाचे माजी प्रशिक्षक राहुल द्रविड हे इंग्लंड कसोटी संघाचे नवीन मुख्य प्रशिक्षक होण्याच्या शर्यतीत आहेत. ब्रेंडन मॅककुलम यांच्या राजीनाम्यानंतर, ईसीबी (इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्ड) द्रविड यांच्यासह इतर संभाव्य उमेदवारांचा विचार करत आहे. ईसीबीकडून विचाराधीन असलेल्या उमेदवारांमध्ये द्रविड यांचा समावेश आहे. या यादीत अँडी फ्लॉवर, अँड्र्यू फ्लिटॉफ आणि जस्टिन लँगर यांसारख्या नावांचाही समावेश आहे. एक दिवस आधी, रविवार ईसीबीने मॅककुलम यांना कसोटी प्रशिक्षक पदावरून हटवल्याची घोषणा केली होती. द्रविड यांची प्रशिक्षण शैली ही त्यांची एक मोठी ताकद ठरली आहे. द्रविड यांचे नियोजित प्रशिक्षण, खेळाडू घडवण्याची क्षमता आणि दूरदृष्टी त्यांना या पदासाठी एक प्रबळ दावेदार बनवते.

## जपान ओपनमध्ये सात्विक आणि चिराग यांचे पुनरागमन



टोकियो : दुखापतीतून सावरल्यानंतर, सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही स्टार दुहेरी जोडी मंगळवारपासून येथे सुरू होणार्या जपान ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत भारताचे नेतृत्व करतील.

तिसरे मानांकन असलेल्या या जोडीने गेल्या महिन्यात इंडोनेशिया ओपनमधून माघार घेतली होती, कारण सात्विकच्या खांद्याची दुखापत बळावली होती. त्यानंतर त्यांनी सिंगापूर ओपनचे विजेतेपद मिळविले. तिच लय पुढे कायम राखण्यासाठी सात्विक आणि चिराग सज्ज झाले आहेत.

पहिल्या फेरीत त्यांचा सामना डेन्मार्कच्या डॅनियल लुंडगार्ड आणि मॅड्स वेस्टरगार्ड यांच्याशी होईल. एकेरीमध्ये, भारताच्या आशा पुन्हा एकदा लक्ष्य सेन, पीव्ही सिंधू आणि आयुष शेट्टी यांच्यावर असतील. या वर्षाच्या सुरुवातीला ऑल इंग्लंड अजिंक्यपदाच्या अंतिम फेरीत पोहोचलेला लक्ष्य, जपानच्या कोकी वातानाबेविरुद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करेल. आयुषला त्याच्या पहिल्या सामन्यात थायलंडच्या दुसर्या मानांकित आणि माजी विश्वविजेत्या कुनलावुत विटिडसर्नविरुद्ध कठीण आव्हानाला सामोरे जावे लागेल. २० वर्षीय आयुषने गेल्या वर्षी यूएस ओपन सुपर ३०० जिंकले होते. या हंगामात बॅडमिंटन आशिया अजिंक्यपदामध्ये उपविजेता ठरला होता

## जसप्रीत बुमराहला जमले नाही, पण त्याने ३ बॉलमध्ये मॅच फिरवली

मुंबई–बर्मिंघम एजबस्टनच्या मैदानार भारत आणि इंग्लंड यांच्यात रोमांचक सामना सुरू आहेत. या सामन्याच्या सूरुवातीला इंग्लंडचे बॅटर आणि भारताच्या बॉलर्समध्ये काँटे की टक्कर पाहायला मिळाली होती. यानंतर इंग्लंडच्या बॅटर्सनी डाव सावरून संयमी खेळी सूरूच ठेवली असती. या दरम्यान जसप्रीत बुमराहकडून विकेटची प्रचंड अपेक्षा केली जात होती. पण त्याला जमलंच नाही आणि टीम इंडियाच्या नवख्या खेळाडूने मॅच फिरवली आहे. कारण त्याने दोन ओपनर्सला पव्हेलियनचा रस्ता दाखवला झाला.

इंग्लंडने टॉस जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला होता. त्यामुळे इंग्लंडकडून बेन डकेट आणि जेकब बेथेल ओपनिंगला उतरले होते.यावेळी टीम इंडियाच्या बॉलर्सच्या तिखट माऱ्यासमोर इंग्लंडच्या बॅटर्सना धावा काढताना प्रचंड संघर्ष करावा लागला होता. पण या दरम्यान खेळाडूंनी आपल्या विकेट फेकल्या नाही आणि संयमाने फलंदाजी करून गोलंदाजांचा प्रतिकार केला.

याच दरम्यान टीम इंडियाचा अनुभवी क्रिकेटपटू जसप्रीत बुमराहला विकेट काढताना यश आले नाही. पण त्याच्या गोलंदाजीमुळे गुरनुर ब्रारला विकेटची संधी मिळाली. गुरनुर ब्राने पहिल्यांदा १३ व्या ओव्हरच्या दुसऱ्या बॉलला जेकब बेथेलची विकेट काढली. बेथेलने मारलेला बॉलवर वॉशिंग्टनने उत्कृष्ट कॅच घेतली. त्यामुळे बेथेल १४ वर बाद झाला.

बेथेल बाद झाल्यानंतर चौथ्या बॉलला गुरनुर ब्राने बेन डकेटची विकेट काढली. ब्रारने टाकलेला बॉल डकेटने थर्ड मॅनच्या दिशेने मारला होता.पण त्या ठिकाण बाऊंन्ड्री लाईनवर असलेल्या जसप्रीत बुमराहने उत्कृष्ट कॅच घेतली .त्यामुळे डेकट ४३ वर बाद झाला. अशाप्रकारे गुरनुर ब्रारने तीन बॉलमध्ये दोन विकेट काढून मॅच फिरवली.

## जसप्रीत बुमराहने इतिहास घडवला!

मुंबई–भारत आणि इंग्लंड यांच्यात एकदिवसीय मालिका खेळवली जात आहे. नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर, इंग्लंडच्या सलामीच्या जोडीने भारतीय गोलंदाजांविरुद्ध आक्रमक सुरुवात करत ६१ धावांची शानदार भागीदारी केली. मात्र, १३ व्या षटकात गुरनूर ब्रारने दोन्ही सलामीवीरांना बाद करत टीम इंडियाला ब्रेकथ्रू मिळवून दिला. पुढच्याच षटकात जसप्रीत बुमराहने कर्णधार हॅरी ब्रूकची विकेट घेत भारताला मोठी विकेट मिळवून दिली. यासह बुमराहने मोठा विक्रम आपल्या नावे केला.

भारताचा आघाडीचा गोलंदाज जसप्रीत बुमराहने ९६८ दिवसांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर एकदिवसीय क्रिकेटमध्ये दमदार पुनरागमन केलं. पुनरागमनाच्या सामन्यात बुमराहने कमाल गोलंदाजी केली. आपल्या पहिल्या चार षटकांत जसप्रीतने केवळ ८ धावा दिल्या. यानंतर स्पेलमधील पाचव्या षटकात इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रूकची विकेट घेत त्याने दोन महत्त्वाचे टप्पे गाठले. या विकेटसह त्याने एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये १५० बळींचा टप्पा पूर्ण केला. तसेच, इंग्लंडमध्ये सर्वाधिक एकदिवसीय बळी घेणारा भारतीय गोलंदाज होण्याचा मानही त्याने मिळवला. बुमराहने एका उत्कृष्ट चेंडूवर हॅरी ब्रूकला बाद केले. बुमराहचा 'बॅक–ऑफ–लेंथ' टप्प्यावर पडलेला आणि उसळी घेणारा चेंडू टप्प्यानंतर सरळ रेषेत गेला. ब्रूकने बॅटचे तोंड उघडले आणि फटका मारण्याचा प्रयत्न केला, परंतु चेंडूच्या अतिरिक्त उसळीमुळे तो बॅटच्या कडेला लागला आणि चेंडू थेट स्लिपमध्ये उभा असलेल्या रोहित शर्माच्या हातात गेला.

हॅरी ब्रूक हा एकदिवसीय क्रिकेटमध्ये बुमराहचा १५०वा बळी ठरला. यासह, सर्वात कमी चेंडूंमध्ये १५० एकदिवसीय बळींचा टप्पा गाठणारा बुमराह हा तिसरा भारतीय गोलंदाज बनला; त्याने ही कामगिरी ४,६०५ चेंडूंमध्ये पूर्ण केली. सर्वात कमी चेंडूंमध्ये १५० एकदिवसीय बळी घेण्याचा भारतीय विक्रम मोहम्मद शमीच्या नावावर आहे, ज्याने ही कामगिरी ४,०७० चेंडूंमध्ये केली होती. सर्वात कमी चेंडूंमध्ये एकदिवसीय सामन्यांत १५० बळींचा टप्पा गाठणारे भारतीय गोलंदाज

४०७० – मोहम्मद शमी

४५१३ – कुलदीप यादवष्न४६०५ – जसप्रीत बुमराह, हॅरी ब्रूकला बाद करून, बुमराह इंग्लंडच्या भूमीवर सर्वाधिक एकदिवसीय बळी घेणारा भारतीय गोलंदाज ठरला. त्याने रवींद्र जडेजाचा विक्रम मोडला; जडेजाने इंग्लंडमध्ये ३० बळी घेतले होते.

## बीड जिल्हा क्रीडा संकुलाच्या २४.९५ कोटींच्या कामांना मान्यता

अत्याधुनिक क्रीडा सुविधांमुळे होतकरू खेळाडूंना प्रोत्साहन

मुंबई–बीडच्या जिल्हा क्रीडा संकुलातील विविध स्वरुपांच्या २४ कोटी ९५ लाख रुपयांच्या कामांना मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निधीतून बीडच्या जिल्हा क्रीडा संकुलात अत्याधुनिक क्रीडा सुविधा तयार केल्या जात आहेत. बीडच्या जिल्हा क्रीडा संकुलाला यापूर्वी आठ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला होता. क्रीडा व युवक संचलनालयाकडून संकुलाचा २४ कोटी ९९ कोटी रुपयांचा आराखडा प्राप्त झाला होता. त्यास उच्च स्तरीय सचिव समितीच्या शिफारशीनुसार मंत्रिमंडळाने आज बैठकीत २४ कोटी ९५ लाख रुपयांच्या कामांना मान्यता दिली.या निधीतून जिल्हा क्रीडा संकुलात सिंथेटीक ॲथलेटीक ट्रॅक, फुटबॉल, हॉकी मैदान, व्हॉलीबॉल, कबड्डी, खोखो मैदान, इनडोअर हॉल इमारत अद्ययावतीकरण, वसतिगृहाच्या तिसऱ्या मजल्याचे बांधकाम, रेनवॉटर हार्वेस्टींग करणे, खेळाची मैदाने आणि परिसराचे बाह्य विद्युतीकरणाचे काम, सर्व इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रणा बसवणे आदी कामे केली जाणार आहेत. ही सर्व कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केली जात आहेत.

# विजयी मार्गावर परतण्यासाठी विराट-रोहितची भूमिका महत्त्वाची

बर्मिंगहॅम : अनुभवी खेळाडू विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या संघात परतण्याने आज (मंगळवार) पासून येथे सुरू होणार्या इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत भारतीय संघाचा पुन्हा विजयाच्या मार्गावर परतण्याचा प्रयत्न असेल. सलग टी–२० पराभवांनी खचलेल्या भारतीय संघाचे मनोधैर्य उंचावण्यातही विराट आणि रोहितला महत्त्वाची भूमिका बजावावी लागेल.



विराट कोहली, रोहित शर्मा आणि जसप्रीत बुमराह यांचे एकदिवसीय संघात पुनरागमन झाले आहे. या दोघांमध्ये खेळाचा अजूनही तोच जोश आणि जिद्द आहे. ते अजूनही सर्वोत्कृष्ट एकदिवसीय खेळाडूंपैकी आहेत. पुढील वर्षीच्या एकदिवसीय विश्वचषकापर्यंत संघात कायम राहण्याचे त्यांचे ध्येय आहे. उपखंडातील खेळपट्ट्यांपेक्षा अधिक आव्हानात्मक असलेल्या खेळपट्ट्यांवर जोफ्रा आर्चर आणि जोश टंगसारख्या अचूक वेगवान गोलंदाजांचा सामना करणे हे एक आव्हान आहे. पण रोहित आणि विराटने गेल्या अनेक वर्षांपासून इंग्लंडच्या गोलंदाजांचा चांगला समाचार घेतला आहे. या मालिकेसाठी संघात या दोन दिग्गज फलंदाजांची उपस्थिती देखील महत्त्वपूर्ण आहे.

भारतीय संघ व्यवस्थापनाने रोहित आणि विराटसाठी गोष्टी सोप्या केलेल्या नाहीत; परंतु संघाची सध्याची परिस्थिती पाहता, त्यांना त्यांचे खुल्या दिलाने स्वागत करणे भाग आहे. एकदिवसीय सामन्यांमधील विजय टी–२० मधील उणिवा लपवू शकणार नाही, पण त्यामुळे खेळाडूंचे मनोधैर्य निश्चितच वाढेल. कर्णधार शुभमन गिलचे पुनरागमन आणि अनुभवी केएल राहुलच्या उपस्थितीमुळे, भारताकडे अनुभवी फलंदाजांची एक जबरदस्त फळी आहे, जी कोणत्याही सामन्याचे चित्र पालटू शकते. जर श्रेयस अय्यरचाही संघात समावेश झाला, तर फलंदाजी विभागाबद्दल फारशी चिंता करण्याची गरज नाही.

मात्र, गोलंदाजी विभागात असे म्हणता येणार नाही, बुमराहच्या पुनरागमनाने गोलंदाजी विभाग थोडा मजबूत झाला आहे. तरी देखील भारताचा नवीन वेगवान गोलंदाज, गुरनूर ब्रार, याला इंग्लंडच्या खेळपट्ट्यांवर एका वेगळ्या आव्हानाला सामोरे जावे लागेल. डावखुरा वेगवान गोलंदाज म्हणून अर्शदीप सिंग निश्चितपणे संघात एक नवीन आयाम जोडेल, तर शिवम दुबे चौथा वेगवान गोलंदाज असेल. फिरकी गोलंदाजांमध्ये कुलदीप यादवचे योगदान मोठे आहे. भारतासाठी ही एक फायद्याची गोष्ट ही आहे की, इंग्लंड संघाने २७ जानेवारीपासून एकही एकदिवसीय सामना खेळलेला नाही. अनेक टी–२० आंतरराष्ट्रीय सामने आणि काही कसोटी सामने (न्यूझीलंडविरुद्ध) खेळल्यानंतर, इंग्लंडला या फॉरमॅटसाठी पुन्हा लयीत येण्यास वेळ लागू शकतो.

दोन्ही संघ पुढीलप्रमाणे

भारत : शुभमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली, श्रेयस अय्यर (उपकर्णधार), केएल राहुल (यष्टीरक्षक), इशान किशन (यष्टीरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल, शिवम दुबे, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, प्रसिद्ध कृष्णा, अर्शदीप सिंग, गुरनूर ब्रार, प्रिन्स यादव. इंग्लंड : हॅरी ब्रूक (कर्णधार), बेन डकेट, जोस बटलर (यष्टीरक्षक), टॉम बँटन, जो रूट, जेकब बेथेल, विल जॅक्स, रेहान अहमद, लियाम डॉसन, जेम्स कोल्स, सॅम करन, गस ॲटकिन्सन, जोफ्रा आर्चर, जोश टंग, साकिब महमूद, आदिल रशीद.



# आषाढी वारी २०२६ : मध्य रेल्वेकडून कलबुर्गी-मिरज दरम्यान १४ विशेष रेल्वेगाड्या

**सोलापूर/प्रतिनिधी:** आषाढी वारी २०२६ निमित्त पंढरपूर येथे येणाऱ्या वारकऱ्यांच्या प्रवासाची सोय लक्षात घेऊन भारतीय रेल्वेने यापूर्वी सोलापूर विभागामार्गे धावणाऱ्या ५८ आषाढी विशेष रेल्वेगाड्यांची घोषणा केली होती. आता या सेवेत भर घालत कलबुर्गी (कर्नाटक) - मिरज (महाराष्ट्र) दरम्यान पंढरपूरमार्गे आणखी १४ अनारक्षित विशेष रेल्वेगाड्या चालविण्याचा निर्णय मध्य रेल्वेने घेतला आहे.

गाडी क्रमांक ०११०७ मिरज-कलबुर्गी अनारक्षित विशेष ही गाडी २३ जुलै ते २९ जुलै २०२६ या कालावधीत दररोज सकाळी ५.०० वाजता मिरज येथून सुटून दुपारी १.३० वाजता कलबुर्गी येथे पोहोचेल. या गाडीच्या एकूण ७ फेऱ्या होणार असून पंढरपूर येथे सकाळी ७.४० वाजता आगमन आणि ८.४० वाजता प्रस्थान असेल.

गाडी क्रमांक ०११०८ कलबुर्गी-मिरज अनारक्षित विशेष ही गाडी २३ जुलै ते २९ जुलै २०२६ या कालावधीत दररोज दुपारी ३.३० वाजता कलबुर्गी येथून सुटून रात्री ११.५० वाजता मिरज येथे पोहोचेल. पंढरपूर येथे या गाडीचे रात्री ८.५५ वाजता आगमन आणि ९.०० वाजता प्रस्थान असेल.

या विशेष गाड्यांना अरग, बेलंकी, सालगरे, कवठेमहांकाळ, लंगरपेठ, ढाळगाव, जत रोड, म्हसोबा डोंगरगाव, जावळे, वासूद, सांगोला, पंढरपूर, मोडनिंब, कुर्डुवाडी, माढा, मोहोळ, सोलापूर, अक्कलकोट रोड, दुधनी आणि गाणगापूर या स्थानकांवर थांबा देण्यात आला आहे.

या गाड्यांमध्ये १४ सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे तसेच २ सामान व गार्ड ब्रेक व्हॅन असा एकूण १६ डब्यांचा समावेश असेल.

या अनारक्षित विशेष गाड्यांसाठी तिकिटे रेल्वे स्थानकांवरील अनारक्षित तिकीट बुकिंग काउंटर तसेच RailOne ॲपद्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. प्रवाशांनी कोणतीही गैरसोय टाळण्यासाठी वैध तिकीट घेऊनच प्रवास करावा, असे आवाहन मध्य रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणा विरोधात निलंग्यात एल्गार

**निलंगा/प्रतिनिधी :** अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या प्रस्तावाविरोधात अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी कृती समिती, निलंगा यांच्या वतीने शासकीय विश्रामगृह, निलंगा येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत उपवर्गीकरणाच्या प्रस्तावावर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली तसेच ३० जुलै रोजी निलंगा येथे होणारा तालुकास्तरीय महामोर्चा अभूतपूर्व करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.



बैठकीत उपस्थित विविध समाजघटकांच्या प्रतिनिधींनी अनुसूचित जातींच्या घटनात्मक अधिकारांवर कोणताही आघात सहन केला जाणार नसल्याचे स्पष्ट केले. उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातींच्या एकात्मतेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त करत, संविधानाने दिलेल्या सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना धक्का पोहोचेल, अशी भूमिका मांडण्यात आली. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने उपवर्गीकरणाचा निर्णय तत्काळ रद्द करून राज्यात सामाजिक सलोखा अबाधित ठेवावे या आंबेडकर वादी जनतेच्या भावनेकडे दुर्लक्ष केले तर सरकारला दूरगामी परिणाम भोगावे लागतील यासाठी समस्त आंबेडकरी जनता या विचारांच्या विरोधात रस्त्यावर येऊन तीव्र स्वरूपात आंदोलन करुन राज्य सरकारला सळो की,पळो केल्याशिवास स्वस्त बसणार नाहीत दोन्ही समाजात जातीय तेढ निर्माण करून राज्य सरकार काय साध्य करणार असा सूरही या बैठकीत काढण्यात आला. याबाबत राज्यसरकार मार्फत वर्गीकरणाबाबत झालेला संभ्रम दूर करावा.या प्रमुख मागणीसाठी निलंगा येथील.समस्त आंबेडकरवादी पक्ष, संघटना, संस्था तसेच निलंगा येथील चांभार,मातंग,ढोर,मुस्ली म.,धनगर,ओबीसी समाजातील प्रतिनिधी उपस्थित राहून मोर्चास पाठिंबा दिला.

मोर्चाच्या तयारीसाठी तालुक्यात जाहीर बैठकीचे आयोजन करण्याचे आवाहनही करण्यात आले. बैठकीत निलंगा शहर व तालुक्यातील प्रत्येक गावातून मोठ्या संख्येने मोर्चास महिला, युवक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी निलंग्याच्या महामोर्चात सहभागी व्हावे, यासाठी व्यापक जनजागृती करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रत्येक भागातून वाहनांची व्यवस्था करून हजारोंच्या संख्येने नागरिकांना मोर्चात सहभागी करण्यासाठी नियोजन आखण्यात आले.

उपस्थितांनी संविधान, सामाजिक न्याय, समता आणि बंधुतेच्या मूल्यांच्या संरक्षणासाठी लोकशाही व संविधानिक मार्गाने संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला. शासनाने समाजात मतभेद निर्माण करणाऱ्या निर्णयांऐवजी विश्वास, संवाद आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत करणारी भूमिका स्वीकारावी, अशी अपेक्षाही बैठकीत व्यक्त करण्यात आली.

सदर बैठकीच्या अध्यक्षस्थानी विलास सूर्यवंशी हे होते यावेळी रजनीकांत कांबळे,अंकुश ढेरे, प्रा. रोहित बनसोडे, धम्मानंद काळे,दाजीबा कांबळे, अर्जुनाप्पा कटके (ढोर समाज), देविदास धैर्य ,खाटिक समाजाच्या वतीने डॉ. प्रमोद हातागळे, मातंग समाजाच्या वतीने सतीश कांबळे,उल्हास वाघमोडे,चर्मकार समाजाच्या वतीने काशिनाथ जाधव,सुभाष भालके,रणवीर भालके, विजय जाधव,धनगर समाजाच्या वतीने झटिंग (अण्णा)म्हेत्रे,मुस्लिम समाजाच्या वतीने शेख सिराज,हज्जू सय्यद, यांच्यासह, नागोराव गायकवाड (दाजी) विजयकुमार सूर्यवंशी,प्रकाश गायकवाड, सूर्यकांत कांबळे,अंगद गवळी ,प्रकाश कांबळे, दाजीबा कांबळे,दिगंबर सूर्यवंशी, देवदत्त सूर्यवंशी, अनंत कांबळे, बंटी कांबळे, शुभम सूर्यवंशी मोहन,सुभाष कांबळे,मोहन वाघमारे, तानाजी सुरवसे,प्रदीप सोनकांबळे,मुन्ना सुरवसे,रोहन सुरवसे,गौतम कांबळे,संदीप कांबळे, लहू ढेरे,प्रविण कांबळे,धनराज कांबळे,संजय हत्तरगे, धनराज कांबळे,यांच्यासह विविध समाजघटकांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील कर्मचारीस महाव्यवस्थापकांचा सुरक्षा पुरस्कार




**सोलापूर/प्रतिनिधी:** मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राजीव श्रीवास्तव यांनी १३ जुलै २०२६ रोजी मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे आयोजित समारंभात मध्य रेल्वेतील १० कर्मचाऱ्यांचा महाव्यवस्थापक सुरक्षा पुरस्काराने गौरव केला. यामध्ये सोलापूर विभागातील वरिष्ठ तंत्रज्ञ (यांत्रिक) सौ. कलावती रामकृष्ण यांचा समावेश आहे.

रेल्वेच्या सुरक्षित संचालनासाठी कर्तव्य बजावताना दाखविलेली सतर्कता, प्रसंगावधान आणि दक्षतेबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामध्ये पदक, प्रशस्तीपत्र, उत्कृष्ट सुरक्षा कार्याचा उल्लेख असलेले गौरवपत्र आणि ३,५०० रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात आले.

सौ. कलावती रामकृष्ण, वरिष्ठ तंत्रज्ञ (यांत्रिक), वाडी (सोलापूर विभाग) यांनी १ जुलै २०२६ रोजी मालगाडीची रोलिंग-इन तपासणी करत असताना १४व्या वॅगनच्या दोन बोगींमधील सहा स्प्रिंग्स गायब असल्याचे निदर्शनास आणले. त्यांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना याची माहिती दिली. त्यांच्या समयसूचकतेमुळे संभाव्य रेल्वे अपघात टळला आणि रेल्वेची सुरक्षितता सुनिश्चित झाली.

यावेळी महाव्यवस्थापक राजीव श्रीवास्तव यांनी पुरस्कारप्राप्त कर्मचाऱ्यांचे कर्तव्यनिष्ठा आणि सतर्कतेबद्दल अभिनंदन केले. अशा प्रकारचे कार्य इतर रेल्वे कर्मचाऱ्यांनाही अधिक दक्षतेने काम करण्यासाठी प्रेरणादायी ठरेल, तसेच प्रवाशांची सुरक्षितता आणि रेल्वे मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध राहावे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या समारंभाला अतिरिक्त महाव्यवस्थापक प्रतीक गोस्वामी, प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी चंद्रकिशोर प्रसाद, तसेच मध्य रेल्वेचे विविध विभागप्रमुख आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# शंखी गोगलगायीचा प्रादुर्भाव रोखा

***धिरज देशमुख यांची सरकारकडे मागणी:***

***पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज***



**लातूर/प्रतिनिधी:** लातुरसह मराठवाड्यातील अनेक भागात शंखी गोगलगाय आणि पैसा आळीचा प्रादुर्भाव आतापासूनच दिसून येत असून ते कोवळे सोयाबीन फस्त करीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरत आहे. हा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सरकारने तातडीने पावले उचलावीत तसेच शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याबाबत आणि त्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत शेतकऱ्यांना आश्वस्त करावे अशी मागणी माजी आमदार मा. श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी सरकारकडे केली आहे.

महाराष्ट्रात काही भागात सतत पाऊस पडत असला तरी मराठवाड्याकडे पावसाने पाठ फिरवली आहे. त्यामुळे शेतकरी आधीच अडचणीत आहेत. कमी पाऊस असतानाही अनेक शेतकऱ्यांनी पेरणीची जोखीम उचलली. लातुरमध्ये आजवर साधारण ३५ टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. पावसाअभावी अनेकांना अद्याप पेरणी करता आली नाही. ज्या भागात पेरणी झाली त्या भागात शंखी गोगलगायीने डोके वर काढले आहे. या संदर्भात शेतकऱ्यांमधून आलेल्या तक्रारींची त्वरित दखल घेऊन माजी आमदार मा. श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी सरकारचे लक्ष वेधले आहे.

मराठवाड्याचा आमचा बळीराजा आधीच पावसाच्या लहरीपणामुळे आणि दुष्काळसदृश परिस्थितीमुळे प्रचंड चिंतेत आहे. निसर्गाची साथ नसतानाही अनेक शेतकऱ्यांनी पदरचे पैसे लावून, कर्ज काढून पेरणीची मोठी जोखीम उचलली. त्यातच आता या नव्या अस्मानी संकटाने अनेक शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. लातूर जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात सध्या 'शंखी गोगलगाय' आणि 'पैसा अळी'चा भयंकर प्रादुर्भाव झाला आहे. ते कोवळे सोयाबीन आणि इतर पिके फस्त करत आहे. डोळ्यादेखत पीक नष्ट होताना पाहून आपला अन्नदाता हतबल झाला आहे. सामान्य शेतकऱ्याकडे आता पुन्हा 'दुबार पेरणी' करण्याची आर्थिक ताकद उरलेली नाही. निसर्गाने साथ दिली नाही, पण सरकारने तरी शेतकऱ्याचा हात धरला पाहिजे. अन्नदात्याला या संकटात एकटे सोडू नका. त्यांना आर्थिक मदतीचा हात द्या अशी आग्रही मागणी माजी आमदार मा. श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी सरकारकडे केली आहे.

# इनरव्हील क्लब ऑफ लातूरचा पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न



**लातूर/प्रतिनिधी :** इनरव्हील क्लब ही आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्वयंसेवी संघटना असून सामाजिक जाणिवेतून ही संघटना कार्यरत आहे. यामध्ये लातूर जिल्हा सुद्धा समाविष्ठ आहे. इनरव्हील क्लब ऑफ लातूर ही या आंतरराष्ट्रीय संस्थेची एक शाखा आहे.

या क्लबद्वारे विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. संपूर्ण जिल्ह्यात आपली एक वेगळी ओळख क्लबने निर्माण केली आहे.

या क्लबचा सन २०२६-२७चा पदग्रहण सोहळा भालचंद्र ब्लड बँकेमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला संस्थापक अध्यक्षा चंद्रकलाजी भार्गव, माजी विभागीय अध्यक्षा निर्मलाजी सोमाणी, लातूर महानगरपालिकेच्या नगरसेविका प्रेरणा होनराव, मावळत्या अध्यक्षा रेश्मा बोरा, नूतन अध्यक्षा शीला यादव, उपाध्यक्षा ज्योती वर्मा, कोषाध्यक्षा डॉ.प्रीती अग्रोया, संपादक डॉ. अश्विनी रोडे, खडज उषा सचदेव, कार्यकारी सदस्या अनुराधा कडेल, ममता अग्रवाल, डॉ.स्वाती शेळके, संता लोया, अनुराधा बेळंबे, कुसुम अग्रवाल आदीची उपस्थिती होती.

याप्रसंगी मार्गदर्शक समिती गठीत करण्यात आली. माजी अध्यक्षा सुनीता अग्रोया, सुमित्रा गोरखे, मेघा अग्रोया आणि सारिका गांधी यांची निवड करण्यात आली.कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. यानंतर मावळत्या अध्यक्षांनी नूतन अध्यक्ष आणि सचिवांना कॉलर प्रदान केले. मावळत्या अध्यक्षा रेश्मा बोरा यांनी वर्ष २०२५-२६ मध्ये संपन्न केलेल्या विविध प्रकल्प आणि कार्यक्रमाची सविस्तर माहिती चलत चित्राद्वारे सर्वांना दिली.

यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना लातूर महानगरपालिकेच्या नगरसेविका प्रेरणा होनराव म्हणाल्या की, इनरव्हल क्लब ही महिलांच्या उन्नती करिता स्थापन झालेली सेवाभावी संस्था आहे. या संस्थेच्या माध्यमातून समाजातील अनेक तऱ्हेचे विधायक कार्य पूर्ण होतात. शिक्षण, दिव्यांग, पर्यावरण, शेती आरोग्य, अनिष्ट रूढी, प्रथा आणि परंपरा या संबंधीचे कार्य केले जाते. पर्यावरणीय बदलांचा अभ्यास करून पर्यावरण संतुलन कसे राहील याकरिता आपण केलेले प्रयत्न हे वाखाण्याजोगे आहेत. ग्रामीण महिलांचे आरोग्य, शिक्षण, अर्थकारण सुधारण्यासाठी कार्य या क्लबने विशेष मोहीम हाती घेतली आहे याचा मला सर्वस्वी आनंद आहे.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून उडान बातमीपत्राचे प्रकाशन प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते झाले व गरीब, होतकरू, एकलपालक असलेल्या व गरजू विद्यार्थिनींना गणवेश वाटप करण्यात आला. .

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शीला यादव यांनी केले, तर सूत्रसंचालन मेघा अग्रोया, डॉ.अश्विनी रोडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार उत्कर्षा भालके यांनी मानले.

# अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्तीसाठी २८ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत मातंग समाज आणि तत्सम १२ पोटजातींमधील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी सन २०२६ मध्ये शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी २८ जुलै २०२६ पर्यंत आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन लातूरचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे. मातंग, मांग, मिनी मादीग, मादींगा, दानखणी मांग, महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गारोडी, मादगी आणि मादिगा या १२ पोटजातींमधील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. या शिष्यवृत्तीसाठी सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेतलेले आणि सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झालेले इयत्ता दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी पात्र असतील. अर्जदार विद्यार्थ्यांनी संबंधित अभ्यासक्रमात सरासरी ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले असणे आवश्यक असून, निधीच्या उपलब्धतेनुसार गुणानुक्रमे ३ ते ५ विद्यार्थ्यांची या शिष्यवृत्तीसाठी निवड केली जाईल.

इच्छुक पात्र विद्यार्थ्यांनी जातीचा दाखला, रेशन कार्ड, आधार कार्ड, शाळेचा दाखला, सन २०२६ ची गुणपत्रिका आणि पुढील वर्षात प्रवेश घेतल्याची पावती या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रतींसह दोन पासपोर्ट साईज फोटो जोडून आपले अर्ज डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, डाल्डा फॅक्ट्री, शिवनेरी गेट समोर, लातूर येथील महामंडळाच्या कार्यालयात २८ जुलै २०२६ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचे ढोकी येथे हजारो भाविकांनी जल्लोषात स्वागत



ढोकी(प्रतिनिधी)- 'गण गण गणात बोते...' आणि 'ज्ञानोबा तुकाराम'च्या अखंड जयघोषात विदर्भाची पंढरी शेगाव येथून पांडुरंगाच्या भेटीसाठी निघालेल्या श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचे सोमवारी (दि. १३) धाराशिव तालुक्यातील ढोकी येथे हजारो भाविकांनी जल्लोषात स्वागत केले. फटाक्यांची आतषबाजी, आकर्षक रांगोळ्यांच्या पायघड्या, भगव्या ध्वजांनी सजलेला पालखी मार्ग आणि हरिनामाच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला.

गेल्या ५७ वर्षांपासून शेगाव येथून आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघणारा श्री संत गजानन महाराजांचा पालखी सोहळा संतश्रेष्ठ गोरोबाकाकांच्या पावनभूमीत असलेल्या ढोकी येथे मुक्कामी दाखल झाला. यावेळी ढोकीसह लातूर, बार्शी, मुरुड, येडशी आणि परिसरातील हजारो भाविकांनी पालखीचे उत्स्फूर्त स्वागत करून महाराजांचे दर्शन घेतले. पालखीच्या स्वागतासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून ते तेरणा साखर कारखाना कार्यस्थळापर्यंत रस्त्याच्या दुतर्फा भाविकांनी मोठी गर्दी केली होती. ढोकी ग्रामपंचायतीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात उपसरपंच अमोल समुद्रे तसेच पालखीचे यजमान विठ्ठलदास भगवानदास सोमाणी परिवाराने पालखीचे स्वागत केले. तेरणा साखर कारखाना कार्यस्थळावर भैरवनाथ उद्योग समूहाच्या वतीने कार्यकारी संचालक विक्रम सावंत यांनी सहपरिवार पालखीचे स्वागत केले. सुभाष व शिऊर शुगरचे चेअरमन सुभाषराव देशमुख, जिल्हा परिषद सदस्य अजित लाकाळ यांच्यासह विविध सामाजिक संस्था, राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पालखीचे दर्शन घेऊन स्वागत केले. मुक्कामानंतर मंगळवारी (दि. १४) पहाटे पालखीचा अभिषेक व महापूजा संपन्न होणार आहे. त्यानंतर संतश्रेष्ठ गोरोबाकाकांच्या पावनभूमी असलेल्या तेर नगरीकडे पालखीचे प्रस्थान होईल. सुमारे ७५० किलोमीटरचा ३३ दिवसांचा पायी प्रवास पूर्ण करून श्री संत गजानन महाराजांचा पालखी सोहळा २३ जुलै रोजी पंढरपूर येथे विठुरायाच्या चरणी दाखल होणार आहे.

वारकऱ्यांजवळील ध्वजांनी सजला पालखी मार्ग श्री संत गजानन महाराजांच्या पालखीच्या स्वागतासाठी भैरवनाथ उद्योग समूह संचलित तेरणा साखर कारखाना प्रशासनाने विशेष तयारी केली होती. पालखी मार्गावर भगवे ध्वज, पताका, स्वागत कमानी आणि आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते कारखाना कार्यस्थळापर्यंतचा परिसर स्वच्छ करून भाविकांसाठी उत्तम व्यवस्था करण्यात आली. कारखान्याचे कार्यकारी संचालक केशव सावंत यांच्या सूचनेनुसार नियोजन करण्यात आले.

दर्शनासाठी आलेल्या भाविकांना भैरवनाथ समूहाच्या वतीने लाडू प्रसादाचे वाटप करण्यात आले. दरम्यान ढोकी येथील कु. गोजिरी प्रसाद कदम या बालिकेने ज्ञानेश्वर माऊलीची केलेली वेशभूषा सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. तिच्या या वेशभूषेचे भाविकांनी कौतुक केले.

## युवराज नळे यांचा सत्कार

धाराशिव (प्रतिनिधी)- सुप्रसिद्ध साहित्यिक तथा भारतीय जनता पक्षाचे सहकारी युवराज नळे यांच्या गझलेचा डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या बी ए बी कॉम बीएससी च्या तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमात समावेश झाला असल्यामुळे त्यांचा सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी नितीन काळे, नगराध्यक्षा सौ नेहा काकडे, गटनेते अमीत शिंदे, नगरसेवक राहुल काकडे, दिनेश देशमुख, राजाभाऊ कारंडे आदी उपस्थित होते.

## ट्रकची मोटारसायकला धडक; एकाचा मृत्यू

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत मयत नामे-विनायक काशिनाथ पवार, वय ५७ वर्षे, रा.घाटपिंप्री ता. वाशी जि. धाराशिव हे दि.११.०७.२०२६ रोजी मोटरसायकल वरुन जात होते. दरम्यान उपळा ब्रिजचे पुढे मधुबन हॉटेलजवळ धाराशिव येथे ट्रक क्र एमएच१० एक्यु ३००६ चा चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक चुकीच्या दिशेने चालवून विनायक पवार यांचे मोटरसायकलला समोरुन धडक दिली. या अपघातात विनायक काशिनाथ पवार हे गंभीर जखमी होवून मयत झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-शिवाजी पंढरीनाथ पवार, वय ५५ वर्षे, रा. घाटपिंप्री ता. वाशी जि. धाराशिव यांनी दि.१२.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.


लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708
9284321472


# शिवारातून हरवत चालल्या रानभाज्या: पारंपरिक रानभाज्यांचे अस्तित्व धोक्यात



उमरगा(प्रतिनिधी)-मृग नक्षत्राच्या पहिल्या सरी कोसळल्या की मातीच्या सुगंधासह शिवारात विविध प्रकारच्या रानभाज्यांची चाहूल लागायची. मात्र, बदलते हवामान, रासायनिक शेतीचा वाढता प्रभाव आणि तणनाशकांच्या वाढत्या वापरामुळे ही परंपरा आता लोप पावत आहे. खरीप हंगामातील पिकांसोबत नैसर्गिकरीत्या उगवणाऱ्या पौष्टिक व औषधी गुणधर्म असलेल्या रानभाज्या दिवसेंदिवस दुर्मिळ होत असल्याचे चित्र उमरगा तालुक्यात दिसून येत आहे. पूर्वी तूर, सोयाबीन, मूग, उडीद, ज्वारी, बाजरी यांसारख्या पिकांसोबत शेतात वाढणाऱ्या तणामध्ये चाकवत, तांदुळसा, अंबाडी, पात्र, घोळ, चवळी, हादगा, तरवटा यांसारख्या रानभाज्या मोठ्या प्रमाणात आढळत होत्या. या भाज्यांमध्ये जीवनसत्त्वे, खनिजे, प्रथिने आणि औषधी गुणधर्म मुबलक असल्याने त्या आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त मानल्या जात होत्या. मात्र, सध्या शेतीकामासाठी मजुरांची टंचाई असल्याने तण काढण्याऐवजी तणनाशकांची फवारणी केली जाते. त्यामुळे तणांसह रानभाज्यांचाही नायनाट होत आहे. याशिवाय रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा वाढता वापर जमिनीची सुपीकता कमी करत असून, सेंद्रिय शेतीही मागे पडत आहे. परिणामी, जुलै-ऑगस्टमध्ये शिवारात सहज उपलब्ध होणाऱ्या रानभाज्या आता शोधूनही मिळत नाहीत. श्रावण महिन्यात शरीरातील वातदोष वाढत असल्याने हलका, पौष्टिक आणि सहज पचणारा आहार घेण्याचा सल्ला आयुर्वेदात दिला जातो. रानभाज्या का ठरतात सर्वांसाठी आरोग्यदायी? पावसाळ्यात उगवणाऱ्या रानभाज्यांमध्ये जीवनसत्त्वे, लोह, कॅल्शियम, तंतुमय घटक आणि विविध खनिजे मुबलक प्रमाणात असतात. चाकवत, तांदुळसा, अंबाडी, पात्र, घोळ, हादगा, चवळी यांसारख्या भाज्या रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करतात. श्रावण महिन्यात वातदोष नियंत्रित ठेवण्यासाठी आणि पचनक्रिया सुधारण्यासाठी या भाज्या उपयुक्त मानल्या जातात. कमी खर्चात उपलब्ध होणाऱ्या या रानभाज्या ग्रामीण भागातील पौष्टिक आहाराचा महत्त्वाचा भाग होत्या. रानभाज्यांच्या रुपात समृध्द नैसर्गिक देणगी उपलब्ध रानभाज्या या निसर्गाने प्रत्येक ऋतूनुसार माणसाला दिलेली पोषणमूल्यांनी समृद्ध अशी नैसर्गिक देणगी आहे. त्यामध्ये शरीराला आवश्यक असलेली जीवनसत्त्वे, प्रथिने आणि खनिजे मोठ्या प्रमाणात असतात. मात्र रासायनिक खते, तणनाशके आणि बदलत्या शेती पद्धतींमुळे या भाज्या झपाट्याने नष्ट होत आहेत. सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देऊन रानभाज्यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा ही जैवसंपदा पुढील पिढ्यांना पुस्तकांतच पाहायला मिळेल. - डॉ. विनोद देवरकर, वनस्पतिशास्त्र विभाग हरवत चाललेली ग्रामीण खाद्यसंस्कृती : एकेकाळी श्रावण महिन्यात प्रत्येक घराच्या स्वयंपाकघरात रानभाज्यांचा सुगंध दरवळायचा. शेतातून ताज्या भाज्या आणून त्यापासून विविध पारंपरिक पदार्थ बनविले जात होते. बदलती जीवनशैली, बाजारपेठेतील भाजीपाल्यावर वाढलेले अवलंबित्व आणि रासायनिक शेतीमुळे ही परंपरा हळूहळू लोप पावत आहे. त्यामुळे रानभाज्यांसोबतच ग्रामीण खाद्यसंस्कृती आणि स्थानिक जैवविविधतेचाही महत्त्वाचा वारसा धोक्यात आला आहे.

रानभाज्या दुर्मिळ होण्याची प्रमुख कारणे तणनाशकांचा वाढता वापर, शेतीमजुरांची टंचाई, रासायनिक खतांचा अतिवापर, सेंद्रिय शेतीत झालेली घट, बदलते हवामान आणि अनियमित पाऊस, पारंपरिक शेती पद्धतींचा लोप अशा या सर्व कारणांमुळे तणांसोबत नैसर्गिकरीत्या उगवणाऱ्या रानभाज्याही नष्ट होत आहेत. परिणामी ग्रामीण भागातील जैवविविधता, पोषणमूल्ये आणि पारंपरिक खाद्यसंस्कृतीवर प्रतिकूल परिणाम होत आहे. अशा काळात रानभाज्या शरीराला आवश्यक पोषक तत्त्वे पुरवतात. मात्र, बदलत्या शेती पद्धतीमुळे ही नैसर्गिक संपदा हळूहळू नाहीशी होत असल्याने पर्यावरणासह ग्रामीण खाद्यसंस्कृतीवरही त्याचा परिणाम होत आहे. तसेच ही जैवसंपदा पुढील पिढ्यांना केवळ पुस्तकांतच पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

# गुणवंतांचा सत्कार; माजी विद्यार्थ्यांकडून गणवेश वाटप:उमरगा तालुक्यातील मलंग विद्यालयात गुणवंतांचा गौरव; शिक्षक-पालक मेळाव्यात स्पर्धा परीक्षांवर भर



उमरगा(प्रतिनिधी)-येथील शरणप्पा मलंग विद्यालयात दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आणि शिक्षक-पालक मेळावा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वीरशैव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिव सुरेखाताई होत्या. सहायक पोलिस निरीक्षक श्रीकांत भराटे, रोटरी क्लबचे अध्यक्ष अनिल मदनसुरे, सचिव शिवशंकर व्हंडरे, संस्थेचे अध्यक्ष डॉ. एम. एस. मलंग, सदस्य संजय मलंग, किशोर शेवाळे, मुख्याध्यापक अजित गोबारे आणि कविराज रेड्डी यांच्या हस्ते सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविकात मुख्याध्यापक अजित गोबारे यांनी विद्यालयातील शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. नववीपासून नियमित अध्यापन सुरू असून विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि कौशल्य विकासासाठी विविध उपक्रम राबवले जात असल्याचे त्यांनी सांगितले. आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी एनएमएमएस व इतर स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी विशेष तास सुरू करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. तसेच विद्यार्थ्यांच्या नाव, जन्मतारीख आदी नोंदी पालकांनी तपासून घ्याव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

मार्गदर्शन करताना सहायक पोलिस निरीक्षक श्रीकांत भराटे यांनी विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे अभ्यास करून स्पर्धा परीक्षांची तयारी करावी, असे आवाहन केले. शासन सेवेत अधिकारी बनून समाजसेवेची संधी मिळते, त्यामुळे मोठे ध्येय ठेवून परिश्रम करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. रोटरी क्लबचे अध्यक्ष अनिल मदनसुरे यांनी पालकांनी मुलांच्या अभ्यासाकडे नियमित लक्ष द्यावे आणि स्वतःही वाचनाची सवय जोपासावी, असा सल्ला दिला. यावेळी दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांनी गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय गणवेशांचे वाटप केले. कार्यक्रमात शिक्षकांनी आपल्या विभागाची माहिती पालकांना दिली. सूत्रसंचालन शिक्षक परमेश्वर सुतार यांनी केले, तर आभारही त्यांनीच मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अगतराव मुळे, सतीश कटके, बालाजी हिप्परगे, विवेकानंद पाचंगे, परमेश्वर कोळी, प्रभावती बिराजदार, मीनाक्षी हत्ते तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांचे ध्येय ठेवा, यश मिळेल स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून समाजसेवेची मोठी संधी उपलब्ध होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यासासोबत स्पर्धा परीक्षांची तयारी करावी, असे आवाहन सहायक पोलिस निरीक्षक श्रीकांत भराटे यांनी केले. तर रोटरी क्लबचे अध्यक्ष अनिल मदनसुरे यांनी पालकांनी मुलांच्या अभ्यासावर नियमित लक्ष ठेवावे, स्वतः वाचनाची सवय लावावी आणि मुलांना योग्य शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून द्यावे, असा सल्ला दिला.

## गवठी दारु अवैध विक्री करताना बेळंब व जुनेर येथे पकडले

धाराशिव (प्रतिनिधी)- मुरुम पोलीस ठाणे अंतर्गत अनुराज उर्फ अशोक क रा.बेळंब ता. उमरगा जि. धाराशिव हे दि १३.०७.२०२६ रोजी बेळंब येथील बसस्थानक जवळ बेळंब ते मुरुम जाणारे रोडचे पश्चिमेस ब्लु स्टार हॉटेल चे बाजूस अंदाजे ३,२०० किंमतीची ३२ लिटर गवठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द मुरुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.तसेच धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत चांगदेव रा.जुनोरी ता. जि. धाराशिव हे दि १३.०७.२०२६ रोजी अंदाजे १,५५० किंमतीची १५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.


**NAME OF CHANGE DECLARATION**
HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS : **SHAIKH NASEER AHEMAD ABDUL GANI** TO: **SHAIKH NASEERAHEMAD ABDULGANI** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **SHAIKH NASEERAHEMAD ABDULGANI** IN FUTURE THE SAME WILL USED BY MY FAMILY WIFE, CHILDREN AND RELATIVE.
OLD NAME :- **SHAIKH NASEER AHEMAD ABDUL GANI**
NEW **SHAIKH NASEERAHEMAD ABDULGANI**
ADDRESS - HATTI GALL NALDURG TALUKA TULJAPUR DIST. OSMANABAD. -413602
ADHAR NO. 731980941157
MOB.NO. 9730039031


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649